# पूर्वस्मृती

बाळ ना. पेंढरकर

१८८३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. १५९८



REFBK-0013497
REFBK-0013497

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३४८४२ विः ५/०२१
क्रमांक १५८६ नों. दि. २.७.६३

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि ...

मनोहर ग्रंथमाला
प्रकाशन ११९ वें

REFBK-0013497
REFBK-0013497

# पूर्व-स्मृति

बाळ ना. पेंढरकर

मकरसंक्रांत १८८४
१४ जानेवारी १९६३

प्रकाशक :
**मनोहर महादेव केळकर**
मनोहर ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

मुखपृष्ठ :
**सौ. पद्मा सहस्रबुद्ध**

मुद्रक :
**वि. प. पराडकर**
अक्षय्य मुद्रणालय
४४३ सदाशिव पेठ
पुणें २

किंमत
तीन
रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों दि ......

माझी दिवंगत भगिनी
कै. सौ. कमल खेर
हिच्या प्रेमळ स्मृतीस

# प्रास्ताविक

' अन् विद्यार्थिदशेसवें हरपलें तें श्रेय माझें जुनें !'

माधव ज्यूलियन.

इ. स. १९२७ ते १९३५ या कालखंडांत प्रस्तुत कवितांची रचना झालेली आहे. दि. २३ फेब्रु. १९३५ नंतर मी कविता लिहिलेली नाहीं. कांहीं तुरळक वगळल्या तर इतर बहुतेक कविता आजवर अप्रकाशितच राहिल्या आहेत. बऱ्याच अवधीनंतर कां होईना पण शेवटीं या प्रकाशनाचा योग येत आहे याचा मला आनंद वाटतो.

' महाराष्ट्र–कवि ' **श्री. यशवंत** यांनीं औदार्यानें व स्नेहभावानें या संग्रहास **चार शब्द** प्रदान करून मला कायमचें उपकृत केलें आहे आणि माझे मित्र **श्री. मनोहर महादेव केळकर** यांचें तत्पर सहकार्य जर मला लाभलें नसतें तर हें प्रकाशन झालें असतें किंवा नाहीं याची मला शंका वाटते. तरी उभयतांचा मी अत्यंत ऋणी आहे.

या प्रसंगीं कविवर्य **कै. भा. रा. तांबे**, व **श्री. स. अ. शुक्ल** यांचें कृतज्ञतेनें स्मरण करणें मी आपलें कर्तव्य समजतों. कविवर्य तांब्यांकडून नेहमीं मिळणारें प्रोत्साहन, प्रेम व आस्था मी कधींच विसरणें शक्य नाहीं. मराठी काव्यसृष्टीशीं माझा प्रथम परिचय मात्र श्री. शुक्लांनींच करून दिला. या कविता म्हणजे श्री. शुक्लांच्याच प्रेरणेचें फल होय. त्यांना या गोष्टीची आठवण आज तीन तपांपेक्षांहि अधिक कालावधीनंतर प्रस्तुत ' **पूर्व–स्मृति** ' द्वारें विनम्र भावानें मी करून देत आहे.

माझ्या त्रोटक काव्यजीवनाशीं संबद्ध अशा कांहीं पूर्वकालीन मित्रांचेंहि यावेळीं स्मरण होणें अपरिहार्य आहे. एका दृष्टीनें या कविता त्या जीवनाचेंच प्रतिबिंबित स्वरूप होत. पण जसें तें जीवन संपलें तशी त्या मित्रांची मित्रभावनाहि कधींच लुप्त झाली. आणि उरलें काय ? तर केवळ पूर्व-स्मृति !

भोपाळ
१ जानेवारी १९६३

**बाळ ना. पेंढरकर**

अनुक्रम ३५७५२ वि. ८१०·२१
क्रमांक ........ नों दि. ...

# हेंहि नसें थोडकें

श्री. बाळकृष्ण नारायण पेंढरकर यांचा हा कवितासंग्रह १९६३ सालच्या सुरुवातीस प्रसिद्ध होत असला तरी, यांतील कवितेचें रंगरूप चालू जमान्याशीं जुळणारें नाहीं. प्रत्येक कवितेखालीं कवीनें स्थलकालनिर्देश साक्षेपानें केला आहे, तो ध्यानीं घेतला म्हणजे एक गोष्ट स्पष्ट होतें कीं, प्रस्तुत कवि मराठी भाषिक मुलखाच्या गाभ्यापासून फार दूर आहेत. त्याचप्रमाणें दुसरी एक गोष्ट स्पष्ट होते ती ही कीं, ज्याकाळीं रविकिरण-मंडळाची काव्यप्रभा पसरलेली होती त्या काळचे हे सहप्रवासी आहेत. ह्या नात्यानेंच मजकडून त्यांनीं प्रास्ताविकाची अपेक्षा केलेली असावी. आडनांवाचें साम्य हा केवळ योगायोग! १९२७ ते १९३५ ह्या कालावधींत लिहिलेल्या कवितांपैकीं निवडक कवितांचा हा संग्रह दिसतो. अर्थातच रविकिरण-मंडळाच्या प्रभेनें न्हालेली ही कविप्रकृति आहे. ह्याचाच अर्थ असा कीं, मराठी कवितेनें आज जी अत्याधुनिक वेशभूषा स्वीकारलेली आहे, ती कवीच्या निर्माण-क्षमतेच्या काळीं अज्ञात होती. अत्याधुनिकतेपासून ही कविप्रकृति बरीच मागें भूतकाळांत आहे. आज श्री. पेंढरकर निवृत्तिकालाच्या वयोमर्यादेपाशीं येऊन पोंचलेले असून त्यांचा काव्यरचनेचा छंद सुटलेला असावा. कारण १९३५ नंतरची कविता इथें गवसत नाहीं. हें ध्यानीं घेतलें असतां कविता-संग्रहाचें ' पूर्वस्मृति ' हें नांव समर्पक वाटेल.

' कवि ' म्हणून मिरविण्याच्या महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन हा कविता-संग्रह प्रसिद्ध करण्यांत येत नाहीं, हें उघडच होय. पूर्वायुष्यांत ज्या भावानु-भूतींनीं त्यांच्या मनावर स्पंदनें उठलीं तीं त्यांनीं त्या काळीं छंदोबद्ध केलीं आहेत. त्यांत सौंदर्य आहे. तें सौंदर्य कधीं शिशुकौतुकाचें तर कधीं प्रणयप्रभेचें आहे.

> **कविता आत्मा तव, मम देवी !**
> **चित्‌शक्तीनें जगा हालवी**
> **हृदयांतुन नव गाणें प्रसवी**
> **रसरसे प्रेमही निर्झरसें**

अशा प्रकारें सौंदर्याचा प्रभाव प्रस्तुत कवींच्या बाबतींतहि काव्यप्रेरक होत असलेला दिसतो " जें रम्य तें बघुनिया मज वेड लागें । गाणें सवेंचि मग होय मनांत जागें " असा जो एक अनुभवजन्य सिद्धांत प्रसृत आहे त्याची प्रचीति प्रस्तुत कवीला आलेली आहे.

नैराश्याच्या कटुतेंतूनहि कांहीं कविता उद्भवलेल्या आढळतील. विरह-विलापहि कुठें ऐकू येतील. भ्रान्त चित्ताचें अबोध भ्रमण कुठें दिसेल. हे कवि कुटुंबवत्सल आहेत. तेव्हां जीवितसखीच्या संगतींत सूक्ष्मतरल नर्म विनोदांचीं उठलेलीं कंपनेंहि कवीला मुरळ पाडतील यांत काय नवल ! आपल्या हातून कांही भरीव, नीटनेटकें, नांव घेण्यासारखें, निर्माण झालें नाहीं याची खंत–

( १ ) पथ अर्धाहि न मी आक्रमिला.
( २ ) फुलेल लतिका कधींतरि म्हणून पाणी दिलें.
( ३ ) ध्येय-चित्रें

इत्यादि कवितांतून बोलकी झाली आहे. आणि सुखासीनताहि त्याला बोंचत आहे. अशा प्रकारची हृद्य कविता हे कवि प्रस्तुत संग्रहद्वारां सादर करीत आहेत.

पण ' सादर करीत आहेत ' असें म्हणणेंसुद्धां कवीच्या ह्या उद्योगाला हेतु चिकटविण्यासारखें होईल. पदरीं जमलेलीं हीं फुलें तशींच पदरांत राहून सुकून जाऊं देण्याऐवजीं त्यांचा गुच्छ त्यानें आत्मरंजनार्थ बनविला आहे. ह्याकडे पाहून—

Something attempted, something done
He earns night's repose

ह्या पद्यपंक्तींची आठवण कोणाला होणार नाहीं ? जीवनकलहांत व्यग्र असणाराला दिवसाकांठीं कांहीं रिकामे क्षण सांपडतात; नव्हे, तसे रिकामे क्षण त्याला हवे असतात. दुसऱ्या दिवसाच्या उद्योगाला नव्या हुरूपानें प्रवृत्त होण्यासाठीं कांहीं करमणूक आणि कांहीं विश्रांति ( झोंप ) त्याला हवी असते. करमणुकीसाठीं कांहीं बाह्य क्रीडासाधनांचा अवलंब करण्यापेक्षां ही काव्यरचनाक्रीडा त्याला आकृष्ट करूं शकली हें कितीतरी पटीनें

चांगलें नव्हे का ? कोणत्या तरी अन्य अ-कलात्मक गोष्टींत मन रमविण्या-पेक्षां कांहीं निर्माण करण्याचा कलात्मक छंद मनुष्याला खरा हुरूप देऊं शकतो. ती त्याची कलात्मक निर्मिती कलेच्या अत्युच्च कसोटीला उतरण्या-सारखी आहे कीं नाहीं, हा लौकिक विचार झाला. त्या विचाराला मनांत थारा न देतांहि अत्यानंद मिळूं शकतो. तो आनंद प्रस्तुत कवीला खास झाला आहे. हेंहि नसें थोडकें !

जेव्हां क्रियाप्रवणता उरलेली नसते, कर्तृत्व संपलेलें असतें आणि उद्योग करण्यासारखी तनमनाची स्थिति नसते, तेव्हां मनुष्याला पूर्वस्मृतींचा उपयोग फार होतो. पूर्वस्मृतीवर तो गुजराण करूं शकतो. वर्तमानाच्या निष्ठुरतेची बोंच बोथट व्हायला पूर्वस्मृतींत रममाण होणें हा उपाय गुणकारी ठरतो. आणि ही गुणकारकता केवळ निर्मात्यापुरतीच नसते. वाचकालासुद्धां ह्या कविता थोड्याफार अशाच उपकारक ठरतील. कविता वाचणारा वाचक त्या कवितेंत असलेल्या रससौंदर्याचा आस्वाद तर घेत असतोच, पण त्याच-बरोबर त्याच्याहि तत्सदृश स्मृती चाळवल्या जातात. आपल्या पूर्वस्मृतींना जाग येण्यानें आपणहि हारपल्या विश्वांत मनानें संचार करूं लागतों. नाहीं तरी, जेव्हां कोणी कवि आपली अनुभूति शब्दांकित करीत असतो तेव्हां तंतोतंत सबाह्यांतर तीच सृष्टि वाचकापुढें उभी करतो, असें नाहीं. आल्प्स पर्वताचें सौंदर्यकवन वाचक जेव्हां वाचतो तेव्हां, आपण न पाहिलेला तो पर्वत प्रत्यक्ष पाहूं शकलों, असें तो म्हणूं शकत नाहीं. फक्त त्या सौंदर्याची किंचित् कल्पना त्याला येते. पण कल्पना म्हणजे साक्षात् दृष्टिसुख नव्हें. तथापि त्या सौंदर्यकवनाच्या अनुषंगानें वाचकाच्या मनांत त्यानें कधीं तरी, कुठल्या तरी पर्वतसौंदर्याचें जें नेत्रसुख अनुभवलेलें असतें त्याचें चित्र त्याच्या चित्तचक्षूंपुढें फिरून उभें राहतें. सरससुंदर कवितांच्या वाचना-पासून हा लाभ होतो. मला उमेद वाटते कीं, ह्या 'पूर्वस्मृती'चें वाचन वाचकांना स्वतःच्या पूर्वस्मृतींचा पुनः पुन्हा प्रत्यय देऊं शकतील आणि खुद्द प्रस्तुत कवीहि मग मनांत म्हणतील कीं,– हेंहि नसें थोडकें !

पुणें २.
२२-१२-६२

यशवंत दि. पेण्ढरकर

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८ | १ | तो | किती |
| ११ | ६ | हें | तें |
| १२ | १३ | सौंद्वर्यी | सौंदर्यी |
| २१ | ९ | कथा | कमा |
| २४ | ४ | नीटपणीं मी न तुज | नीटपणें मी न तुला |
| २७ | १० | रात्रिंसारखें | रात्रिं सारखें |
| ३३ | ३ | वदन | वचन |
| ४१ | २ | या सदा | त्रासदा |
| ८३ | १२ | तैं | तें |
| ८३ | १३ | तें | ते |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि ........

# सुनीतें

| | | | |
|---|---|---|---|
| ते क्षण | ... | पृष्ठ | ३ |
| बाला नाजुक ही | ... | ... | ४ |
| ही विभ्रमे मन्मती ! | ... | ... | ५ |
| ईशें अर्पियलें- | ... | ... | ६ |
| कोठें दूर वनांतरीं भटकतां | ... | ... | ७ |
| काळ आणि मी | ... | ... | ८ |
| अस्थिर मानस | ... | ... | ९ |
| अशांत अंतर्बाह्य | ... | ... | १० |
| मातृभूमीप्रत | ... | ... | ११ |
| लावण्यें दिसतीं किती जगतलीं | | ... | १२ |
| ते अम्हां हंसतां अम्ही हंसु तया | | ... | १३ |
| तें पुष्प | ... | ... | १४ |
| छायाचित्र | ... | ... | १५ |
| तें गाणें सरलें | ... | ... | १६ |
| वृत्तिपालट | ... | ... | १७ |
| अवमानिल्यानंतर | ... | ... | १८ |
| उत्तररात्रीं | ... | ... | १९ |
| कालियादेह महालावर | ... | ... | २० |
| रम्या मालवभूमि | ... | ... | २१ |
| माझी ती भगिनी दिवंगत जरी | | ... | २२ |

# ते क्षण

माझ्या दृष्टिसमोर फूल हंसतें, वेडी उषा लाजते
माझ्या दृष्टिसमोर गान करितो कोकीळ वृक्षावर
माझ्या दृष्टिसमोर हास्य हंसतें, सौंदर्य हो सुंदर
माझ्या दृष्टिसमोर येइ न परी, जें अंतरीं नाचतें !

गेले सौख्यद मागले क्षण अहा ! अदृश्यता पावले !
तेव्हां दिव्य सुखा ! तुवां सजविलें हें फाटकें जीवन
गेला काळ परी कसा झरझरा ! आतां करी सांत्वन
त्या पूर्व-स्मृतिवीण कोण अमुचें ? सारेंच आटोपलें !

झालें जीवन शुष्क– व्यर्थ उठती डोक्यांत या कल्पना
काळाच्या गत वैभवांत सरल्या साऱ्या खुळ्या जल्पना
गेले ते क्षण दूर– काय करणें आतां असें त्रासुनी
जें झालें गत– का पुन्हा परतणें तें मी असें दुःखुनी ?

त्यांची केवळ ती स्मृती पुनरपी येतां अतां सत्वरीं
मी हांसेन खुशाल – मूढ हृदया या अंतरीं जाळुनी !

दा. क्र. 93८९६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३४५५२ वि:
क्रमांक नों. दि.



झांशी, १० फेब्रुवारी १९२९

## बाला नाजुक ही

बाला नाजुक ही— अजून पुरतीं झालीं न वर्षें सहा
येवोनी जगतांत या—हंसतसे कैशीं मुदें ही अहा !
हास्याचा सरतांच तो रस— क्षणीं गंभीरता पावते
राही स्वस्थ न ती परी पळभरी— हांसू पुन्हां लागते;

आकाशांतिल कीं जगीं अवतरे ही चंद्रिका हांसरी
पुष्पांच्या जगिं मोगऱ्यांत वसते ही सुंदरी लाजरी
पाण्याच्या मृदु पृष्ठभागिं उठती जेथें तरंगावली
कीं देवी तिथलीच ही भ्रमविण्यां आह्मां इथें पातली;

बाले ! नाजुकता तुझी मृदुल ही राहील का शाश्वत ?
हास्याची लहरी तुझ्या मुखिं गडे ! राहील का ही नित ?
वेल्हाळे ! हंसशी— अम्हां सुखविसी तूं आज येथें अहा !
भाग्यीं काय तुझ्या पुढें ? तुजहि हें लाभे जिणें येथ हा !

देवी ही— बसुनी सुशोभविल त्या स्वर्गांत सिंहासनां
कां दुःखी जगतींच निर्मिसि हिला धात्या ! अरे दुर्जना !

ग्वाल्हेर, ४ सप्टेंबर १९२७

पाही चातक दृक् नभीं फिरवुनी कोठें पयोदाकडे;
ओढी माय शिशूस सन्निध– उरीं आशा मधू हांसते;
होती लीन विभूपदीं मिळविण्यां ती सद्गती संत ते;
शोधी प्रेमाचि केवळ प्रियतमीं– इच्छी वधू तेवढें !

ही वृत्ती जगिंची– नको मुळिं तया पाषाण काळे कडे;
सोडोनी लतिकेस कोण सुकल्या पर्णांकडे पाहतें ?
टाकोनी व्यवसाय कोण गगनीं वायूपरी धांवतें ?
देईना फल आम्र–तुच्छ म्हणुनी सर्वांस तो नावडे !

पाहोनी मजही मनीं कितिक ते कांहींतरी कल्पिती—
ते आप्त, प्रिय मित्र, बंधु–भगिनी, अन् भोंवतालीं दुजे;
दृष्टिक्षेपच वर्षतां मजवरी त्यांच्या मनींचीं गुजें
होतीं स्वल्प झणीं परन्तु रचिल्या आशा बृहत् दाविती !

अन् येतांच विचार ‘पूर्णकरणीं मी त्या अपेक्षाततीं
आहे शक्तच कीं अशक्त ?’ सहजीं ही विभ्रमे मन्मती !



शुजालपूर, २३ ऑक्टोबर १९३१

ईशें अर्पियलें–

ईशें अर्पियले सुरेख असले हे दोन डोळे मला
वाटे मात्र विषाद आज तिसरा तोही न कां लाभला ?
डोळ्यांनीं बघतों जगांत सगळ्या वस्तू–मनीं हांसतों
नाहीं तोष परी जिवास म्हणुनी तैसाचि कंटाळतों !

पूर्वीं जीव असाच ‘ मुग्ध नयना ’ पाहूनि संतोषला
होता काळच, रम्य तो गत जरी -- नाहीं कधीं कल्पिला
‘ ती दृष्टी ! ’ मज मोक्ष तींत गमला--यांनीं अहा ! दाविला
आतां ती फिरतांच दूर बसले गाळीत हे अश्रुला !

काव्याचा मज नाद -- काव्य सुमनें प्रेमें कितीं गुंफिलीं
तेव्हां तीं दिसलीं सुरेख सगळीं तैशीं जनां वाटलीं
आतां कां बघतात नेत्र पुढतीं कोऱ्याच पानावर
कां होई मनही नवीन बघण्यां कांहींतरी आतुर ?

देवा ! देई मला सुनेत्र तिसरा त्यानें तरी पाहुंदे
संतोषामृतपान पूर्ण करुनी ती शांतता लाभुं दे !

झांशी, ३ नोव्हेंबर १९२८

## कोठें दूर वनांतरीं भटकतां

कोठें दूर वनांतरीं भटकतां सृष्टिच्छवी मोहवी
तेथेंही गृहिंची स्मृती पुनरपी ओढी मनां मागुती
हांसे सृष्टिसती नितांतमधुरा -- प्रेमौघ सुस्वागतीं
चित्ता शांत करी -- तरीहि कुठली चिंता तया भारवी;

आल्हादें नयनां मिटोनि बसतां जी भावना गुंगवी
तीचें रूप सुरम्य लोपुनि झणी दे उग्रता ताप ती
घेवोनी कविता करीं मृदुलशीं पुष्पें सुखानें -- मती
पुष्पें हुंगत काव्य वाचित करी आयोजनाही नवी;

जाशी धांवत दूर सौख्य बघण्या तूं व्यर्थ वेड्या मना!
वेडी कल्पकता तुला फसविते -- कां भाळशी तीवरी?
ही जाईल उडोनि उंच गगनीं वाऱ्यापरी कल्पना
येथें मात्र दिसेल मर्त्य वसुधा -- दुःखें सुखाशा जरी!

ईशा आळवितां समोर दिसते भेसूर भूतावली!
ध्येयाचा पथ आक्रमूं? -- अडखळे मी पावलोंपावलीं!



इंदूर, ५ जानेवारी १९३२

## काळ आणि मी !

जातो काळ तो भराभर -- मला हातीं धरोनी सह
ओढी -- दूर करी खुशाल सगळ्या प्रेमी जनांपासुनी
साऱ्या आवडिच्या मनोज्ञ मधुरा वस्तू दुरी सारुनी,
तें अस्तंगत पूर्वजीवन करी -- हो कल्पना दुस्सह;

नित्य दृष्टिपुढें कितीं चमकतीं चित्रें मनासारखीं
होतो मोद बघूनि तोंच लपतीं कोठें पटाआड तीं
येतीं आणिकही दुजीं -- शमवितीं उत्सूकता वाढती --
होतो लोप -- कितीक चित्रपट ते मी विस्मयें पारखी;

दृष्टि, स्पर्श, विभिन्न रम्य रसना, संवेदना तोषद
सौंदर्य - प्रिय - सत्य - दर्शक अशा भव्य क्षणांच्या कृती
घेती येथ विशाल नित्य गिरक्या जेव्हां जिवाभोंवतीं
मी त्यांना कवळी -- वियोग घडवी तो दुष्ट दुःखप्रद;

हा हा ! सांप्रत वर्तमान म्हणतें हें 'मी तुझें रे मुला'
देऊं उत्तर का 'कथीन अपुलें नातें उद्यां मी तुला ?'

इंदूर, २१ मार्च १९३२

माझ्या अस्थिर मानसास रिझवूं कोण्या उपायें अतां !
झालों विभ्रमबद्ध -- प्रश्न न सुटे कांहीं न ये सांगता
हो कोलाहल तापदा, भडकली ज्वाला उरीं दारुण
किंवा कापित सारखें चरचरा वाटे कुणी आंतुन;

कष्टाचें जरि वाहणें सततची हें रुक्षसें जीवन
ठेवावें नच काय अंतर तरी तूं शांत हें राखुन
कांटेरी झुडुपावरी चढवुनी सारी लता कोमल
ईशा जाळिसी कां वृथा तिज वनीं तूं थांबवूनी जल;

भाजे आंग उन्हांत -- मी तडफडे ज्योत्स्नासुखाकारणें;
तेजें हे दिपतीच नेत्र म्हणुनी नेच्छीच मी पाहणें,
कंटाळे वच ऐकुनी जन -- रवीं, मोहीत संवेदना
अस्पष्ट प्रणयोद्भवा मधु, परी सन्नीध ती येइना.

माझें एक असें, दुजें परि दिसे त्याहूनि कां मोहक
राहो तेंहि तसें परी कधिं न हो माझें मला दाहक.



इंदूर, १३ जानेवारी १९३२

# अशांत अंतर्बाह्य

जेव्हां पाहतसे समोर सहजीं बाहेर दारांतुन
विश्वाचें सुखदु:खमिश्र बघतें भिन्नत्व माझ्याकडे
अन् येतात मनांत भावलहरी – अस्थीरता कंपन
शांत प्रावरणांतरीं उठविते – जीवा पडे सांकडें !

जेहां हो स्थिर सर्व ओघ सगळा जातां सरोनी दुरी
अंत:सृष्टि मदीय दीप्त दिसते – जाई तिथें मी मग
प्रक्षुब्ध प्रिय कल्पनापवन हो – फेकोनि गूढांबरीं
देई जेथ तमिस्र सर्व मज – हो भेसूर तेंही जग !

जेव्हां मी उडतों पतंगसम त्या गाढांधकारांतुनी
होई लुप्त हळूहळू मजसवें मद्विश्व कोठेंतरी
मृत्यूची पसरे तिथें अवकळा जाळें जणू गुंफुनी
होई सज्जचि बांधण्या मजसि तो वाटे क्षणांभीतरीं;

ये अंगावरि एक शीतलहरी, भंगे समाधिस्थिती –
अंतर्बाह्य अशान्त हें बघुनि मी धिक्कारि दैवकृती !

इंदूर, ८ फेब्रुवारी १९३२

मातृभूमीप्रत –

नाहीं मीं त्यजिली कधींहि जडता ही त्वत्सुखाकारणें
नाहीं मीं धरिली कधींहि हृदयीं कांहीं स्पृहा पाहतां
धीरोदात्त तुझे गुणी सुत कसे सारे तुला सेवितां
मृत्यू – कष्ट जुमानिती नच मुळीं – मीही तुला पूजिणें;

क्रान्तीचें नव वातचक्र फिरतें – ज्वालामुखी पेटणें
त्यागाचा नित – हेंच कार्य घडवी विश्रांत हें मुख्यता,
होता स्फोट अखंड चोंहिंकडुनी सारी जळे जीर्णता,
फेके दूर उदास दास्य – धरणी कंपे तयाच्या गुणें !

मी निद्रिस्त परी – मला नच दिसे दिव्यत्व तें, जागृती,
मी कर्तव्यविहीन, मूढ; नच ये उत्साह माझ्या प्रती,
तारुण्यींच मला दिसे पलिकडे पाताळिंची ती कड
अर्धे पाउल त्या दिशेंत वळलें – निर्जीव मी लाकुड !

लज्जाशल्य उरांत घाव करितें निःशब्द तें साहुनी
आई ! दुर्मुखल्या मुखास लपवी हें लेकरूं दुर्गुणी !

१० : ११ इंदूर, १० फब्रुवारी १९३२.

## लावण्यें दिसतीं कितीं जगतलीं

लावण्यें दिसतीं कितीं जगतलीं – त्यांच्याकडे पाहुनी
वेडें चित्त क्षणैक मोहवश हो – ये गूढ बेभानता;
एकेकांतिल सौख्यबिंदुभंवतीं दूरूनि घोंघावतां
तें भृंगासम सेवण्या बघतसे माधुर्य संतोषुनी,

वाटे यांत विषाद कां मग जना ? कां रागवावें कुणी ?
साऱ्या शिष्ट-मनां दिसेच लटकी कां यांत दोषार्हता ?
हा आयु:पथ चालतां मिटवितां डोळेच कीं हो अतां !
इच्छा का रमणीयता विविध ही द्यावी अम्ही फेकुनी !

जें जें रम्य उदात्त – त्यास उचलूं कोठेंहि तें आढळो,
जें हृत्कंप करी तया स्थिर करूं ओढुनिया अंतरीं,
पूजूं जें नित पूजनीय अमुचें कोणा कळो ना कळो,
जें आहे चिरवांछनीय मिळवूं त्याला स्व-वांछाबलें;

सौंदर्यीं रममाण होउनि इथें हांसूं सुखें आपुलें
देवो दोष खुशाल ते अभिरुची ज्यांची असे घाबरी !

इंदूर, ४ डिसेंबर १९३२.

पूर्वस्मृति

## ते आम्हां हंसतां अम्ही हंसु तयां

ते आम्हां हसतां अम्हीं हंसु तयां – चिंता जिवा कोमल
कां बाले – मज सांग – लागलि अतां येतां सुखाचा क्षण ?
वेडे ! हें जग सर्व नित्य हंसते सर्वांसची निष्फल
पर्वा काय अम्हां -- अम्ही करितसूं हृत्प्रीतिचें रक्षण !

सोडावी मग कां तिलांजलि अशा प्रेमावरी सोज्वल
ऐकोनी असले तिरस्कृत जगीं हेटाळणीचे सुर ?
आशेचीं किरणें अहा ! उगवलीं हीं आज आम्हांवर
सन्मार्गीं वळण्या प्रकाशच अम्हां देईल त्यांचा, बल !

भीती सोड -- गडे ! पुढें बघ अतां मार्गाकडे आपुल्या
ध्येयाला विसरू नको -- मग उरे चिंता कशाची तुला ?
आम्हां स्वर्ग जरी इथें वसविणें भूमीवरी आज या
प्रेमाच्या परमेश्वरा विनविणें -- त्याकारणीं लागुं या !

चित्तीं सत्य, पवित्रता -- हृदयींही निस्वार्थ प्रीती वसे !
आम्हीं कां मग सांग जीव -- कलिके ! भीणें जगाला असें !



ग्वाल्हेर, १९ सप्टेंबर १९२७

नाहीं एकहि शब्द तो उमटला तोंडांतुनी त्या क्षणीं
नाहीं एकहि अश्रुबिंदु गळला नेत्रांतुनी सत्वर
सारी दृष्टि मनोहरा मजकडे ती सारखी लावुनी
अर्पाया मृदु पुष्प एक मजला ती जाहली आतुर.

माझी दृष्टि फुलाकडे न वळली -- मी खिन्नचित्तें परी
होतों पाहत त्या फुलाहुनि मृदू तो गोडसा चेहरा
'आतां हा दिसणें पुन्हां मज कधीं' ही भावना अंतरीं
नाचे -- तों जवळीं वियोगक्षणही धावूनि आला पुरा.

'येतों मी' वदलों हळूंच -- धरिलें तें पुष्प प्रेमें करीं
तों आले दंवबिंदु नेत्रयुगुलीं वर्षाव पुष्पावरी
झाला त्याच -- अहा ! सुशब्द उठले त्या रुद्ध कंठांतुनीं
'जातां जा ! -- स्मृति नित्य मात्र असुद्या ही एक वेडी मनीं--'

त्या पुष्पाकरितांच जीव अडला या रुक्षशा जीवनीं
त्या पुष्पाकरितांच तीव्र उठते उत्कंठता मन्मनीं.

ग्वाल्हेर, ७ ऑगस्ट १९२७

## छायाचित्र

‘ छायाचित्र सुरेख तें कधितरी काढूं गडे ! आपण ! ’
होतें मीं दिधलें तुला सुखविण्या तें एक आश्वासन
झाला निश्चयही क्षणांत पुरता – संतोषली तूं – पण
मच्चित्तीं क्षणिं जागली विषम ती दुर्बोधता दुर्दम;

वेडा मी – मज भोंवतीं पसरलें दुर्बोधतेचें तम
मन्नेत्रा दिसलें कधीं न – कधिही जें मन्मनां वाटलें
‘ - छायाचित्र कशास – काय अडतें तें एवढें त्याविण ’
दुर्दैवें असले अशुद्ध उठले दुर्भाव माझ्या मनीं;

सारीं तीं तुजलाच अर्पित वचें दुर्लक्षिलीं मीं जुनीं
अन् वेडे ! मग नित्य तूंहि भरिले हे नेत्र गंगाजलें
नेत्रांना पदरें पुसून वदसी – तो आठवूं का दिन ?–
‘ छायाचित्र नको मला – मज पुरे ते हांसरे आपण ! ’

त्या दृष्या जरि आज लोटति बहू वर्षें तरी तेवढें
छायाचित्रच आज मन्मनिं उरे हें संस्मृतीचें गडे !



कोलारस, १९ ऑक्टोबर १९२७

# तें गाणें सरलें

तें गाणें सरलें – परन्तु नव्हती तंद्रा मुळीं भंगली
ओठांनीं कथिलें हळूंच मग या कानांत कांहींतरी
तें गाणें विरलें – परन्तु लहरी वाऱ्यावरी गुंगली !
कर्णांना कळलें न काय वदली तें गोडसें सुंदरी.

झाला कंपित हात दूर सहसा तीचा अहा ! कोमल
एकाकीं पुटपूढ गोड मुखिंची ती थांबली बारिक
तेजानें हंसऱ्या सुशोभित तिचा तो चेहरा नाजुक
झाला पीत क्षणांत -- तेज नुरलें नेत्रांतलें सोज्वल !

तें गाणें सरलें -- 'अहा' म्हणत मी तंद्रेंतुनी जागलों
तें गाणें विरलें -- म्हणून लहरी वेंचावया धावलों !
'एखादी लहरी असेल लपलीं ओष्ठींच या मंजुळ
पाहूं कीं तिजला !' म्हणूनि वळलों -- नेत्रीं दिसें तों जळ !

झालें धस्स मनांत -- 'काय' पुसण्यां प्रेमें पुढें जाहलों
तों सारें कळलें -- मनांत सहजीं मी फार पस्तावलों !

ग्वाल्हेर, २७ एप्रिल १९२८

तेव्हां हे मम शब्द गोड म्हणुनी तूं ऐकुनी घ्यायचे;
घेसी नित्यच आग्रहें वदवुनी – तृप्ती न व्हावी तुझी,
आतां ही रसना तुला सुख न दे, प्रेमादरें पूर्वि जी
कैशी पूजियलीस तूं ! नच तुला मद्वाक्यही तें रुचे !

माझें चित्त थरारतें बघुनि गे ! हें वागणें आजचें,
वृत्तीपालट कां अकारण घडे ? ही विंधिते काळजी !
केलें प्रेमच ना तुवां प्रणयिनी ? का दीन या सावजीं
ती त्वत्भेदनचातुरी बघितली; हा ! धीर माझा खचे !

तूझें रूप विलोल, मादक सुरा जैशी तुझी चारुता,
तूझी वाक्पटुता, तुझी कुशलता अन् ती कलाभिज्ञता;
यांना मी भुलतांच पाश रचिलें मद्भोंवतीं दूसरे
मायालाघव प्रीत एकवटुनी तूं बांधलेंसी बरें !

झालें वर्ष न तें अजून पुरतें जों आपुल्या संगमा
तों कापूं झटलीस दुष्टहृदये ! या प्रीत – कल्पद्रुमा !



इंदूर, ५ डिसेंबर १९३४

तूं गेलीस निघोनि दूर नि तुझी अस्पष्ट चित्राकृती
हो अस्तंगत पश्चिमेंत कलत्या त्या अर्धभानूसवें;
त्वत्पश्चात् अनुगामिनीच जणुं ती संध्या तुझ्या संगती,
झाली लुप्त, शिळेवरीच बसलों गाळीत मी आंसवें !

अंध:कार भयाण गाढ भंवतीं माझ्या किती दाटला
झाली तीव्रतरा असह्य हृदयीं कोठेंतरी टोंचणी !
टेकोनी दगडावरी शिर तिथें किंचित् मनीं चाळिला
होता जो गत अल्पसाच अपुला संबंध या प्राक्तनीं !

कानीं रातकिडे विचित्र करिती तो किर्र कूटध्वनी
कोल्ह्यांची दुसरीकडून उठली भेसूरशी ओरड,
वायू रोदनसूर देत, उठले कल्लोळ माझ्या मनीं,
अन् आले व्यथितांतरीं कितिक ते दु:खें विषारी कढ !

तेव्हांपासुन जें मनांत वसलें ठाणें भयाचें असें;
त्यानें पालटिलें समूळच – अतां तो पूर्वींचा मी नसे !

इंदूर, २१ डिसेंबर १९३४

पाही मी वरि – अंतरिक्षिं निजलीं तेजाळ तारांगणें,
कोठें एकिकडेच फिक्कट हंसे दूरूनि ती चंद्रिका,
ज्योत्स्नायुक्त सुषुप्तिमग्न रजनी, मंदावली दीपिका
शेजेसन्निध मंद गंधलहरी हेलाविल्या वायुनें;

जीं मोदें हंसलीं दिनीं मधुमयी दृष्टी जगीं फेकुनी
'ती'ची नेत्रसुमें सुखांत मिटलीं होतीं प्रशान्त क्षणीं;
ते गालावरचे गुलाब निजले स्वप्नाचिया प्रांगणीं
मंदश्वास निघे, करांगुलि स्थिरा टाकी मना मोहुनी !

तें सुप्तास्थितिमग्न चित्र – वदनीं त्या लोपल्या भावना,
तैसें मुग्ध विकार, दृश्य दिनिचें सारें नुरें तेथुनी;
शुभ्र स्निग्ध करीं करी शशि मधू वर्षाव कीं दूरुनी
शीतस्रोतज मंद धार धुवुनी टाकी तया पावना !

शान्ति प्रीतियुता मुखावरि परी तीच्या मला भासली,
मी डोळे मिटले; पुन्हां उघडितां होती उषा हांसली !



इंदूर, ९ डिसेंबर १९३१

तेथें त्या हिरव्या लता, बहरलीं पुष्पें मृदू सानुलीं
सारी सौरभयुक्त गोड पुढती ती पर्णराजी हंसे
वाहे झोत खळाळुनी नवनव्या कोठें तरंगावली
होई शांत गभीर नाद — खिळुनी दृष्टी तयीं कीं फसे !

चित्ताकर्षक दृष्य विश्वरचिता — वाटे करी चित्रित
ठेवी मानवतेस वश्य करण्या दावूनि आमीष हें;
कीं व्हावें म्हणुनी कृतज्ञच तया, कीं दिव्य भक्तीरत
माझें चित्त वळें परी न तिकडे ना कल्पना ती सहे !

जाई स्वैर, मना ! कुठूनि तरि ती आणी सुधादायिनी
कर्तव्य - प्रणयांत जी सहचरी माझी शुभांगा गुणी
तीच्या शुद्ध सुकोमलांकिं अथवा वक्षस्थलीं हें शिर
मी ठेवूनि सुखांत तृप्त नयनीं पाहीन विश्वावर !

— नाहीं ती ! म्हणुनीच काय हंसतें हें दृश्य, वेड्यास या ?
कोणा आळवुं मी घडी काधिंतरी ऐशी पुन्हां यावया !

---

* उज्जयिनीजवळील शिंद्यांचा सुप्रसिद्ध पुरातन महाल.

उज्जयिनी, २ सप्टेंबर १९३०

रम्या मालवभूमि ! यौवन तुझें राहे सदा शाश्वत;
नाहीं तें गतिमान्, नच क्षय तया, ठावें न त्या जीर्णता
तूं आहेस जरी पुरातन – उभी कालांतरें पाहत,
तूझें रूप परी मनोज्ञच, तुझी ती ना ढळे चारुता;

तूं उत्फुल्ल फुलांसवें, विविध हीं स्थानें तयीं दाटतीं,
वृक्षांची घन पल्लवीहि रुचिरा चारी दिशाभीतरीं !
शेतें रम्य उभीं, तयांवरि सुखें वायू करी निर्मिती
लाटांची; पसरे पठार पुढतीं समृद्धता जें वरी;

तद्रूपें हरिलीं इथें जनमनें, तूझी कथा मोहिनी
एखाद्या अतिरिक्त मोहित करी, उत्स्फूर्त हो तें मन !
तूं अंकीं धरिला कवीकुलगुरू त्या वैभवाच्या दिनीं,
तांबे, दत्तहि आज हे उभविले; काव्यात्मतेचे कण

निर्जीवी तव वृत्तिकेंत भरले जे, ते सुखें वेंचुन
यांनीं भूषविली गिरा मधुमया भावप्रभावें जनीं !

१३४९८

२० : २१

इंदूर, २३ फेब्रुवारी १९३५

## माझी ती भगिनी दिवंगत जरी—

माझी ती भगिनी दिवंगत जरी – एकेक तीचा वच
नित्याचा करितो अजून तसला कानांत गुंजारव
तें तोंडावरचें सुरेख हंसरें कांहींतरी गोडसें
येतें दृष्टिपथावरी निशिदिनीं नाचावयाला मम !

चंद्राचीं किरणें नवीं सुचवितीं स्नेहप्रदा मंगला
– मायामुग्ध करी मला बघत जी – डोळ्यांतली देवता,
कोठें चित्र सुरम्य, शांत अथवा सृष्टी वनश्री दिसे
येते धांवत ती तयांतुनाचि कीं भेटीस माझ्याकडे !

डोळे घट्ट कुणी क्षणांत मिटले माझे असे मागुनी ?
हें हांसे पुढतीं अतां खदखदा – थट्टा करी कोण ही ?
"भैय्या !" – हा ! – मज हांक कां परि अशी देशी दुरूनी गडे ?
ये माझेजवळीं – बसूं क्षणभरी – बोलूं – तुला वेडवूं ;

ठेवूं दे कर हा पुन्हां तव मृदू पाठीवरी आणखी
तूं येथें बसशी ! – दिवंगत कशी ? – होई असें कां मला ?

झांशी, १६ फेब्रुवारी १९३०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम [illegible] वि: 
क्रमांक [illegible] नों. दि. [illegible]

# भा व गी तें

| | | | |
|---|---|---|---|
| नजरेंत जुईचें फूल हंसे | ... | पृष्ठ | २५ |
| निरोप घेतांना | ... | ... | २६ |
| एका गुणवती सुंदरीस | ... | ... | २७ |
| पुरतें नीटपणीं मी न तुज पाहियलें | | ... | ३० |
| पाहसी कां अंत माझा | ... | ... | ३१ |
| दर्शन दे | ... | ... | ३२ |
| करुणेप्रत | ... | ... | ३३ |
| संसार | ... | ... | ३४ |
| भेट | ... | ... | ३६ |
| विषमता | ... | ... | ३८ |
| जातसे तोल गिरक्या खातां | ... | ... | ३९ |
| गीतसमाप्तीनंतर | ... | ... | ४१ |
| व्यर्थ कां असें हंसणें | ... | ... | ४३ |
| एक चित्र | ... | ... | ४५ |
| कां गडे बघसि तूं खुळ्यापरि | ... | ... | ४६ |
| नको फुलावर रुसूं | ... | ... | ४७ |
| पत्रलेखन | ... | ... | ४९ |
| न तें बाल्य-सौंदर्य दृष्टीपुढें ये | ... | ... | ५० |
| वादळ | ... | ... | ५१ |
| यतींद्रांची स्मृति | ... | ... | ५२ |
| दैव धाडी भूवरि | ... | ... | ५३ |
| पथ अर्धाहि न मी आक्रमिला | ... | ... | ५४ |
| भडकलेला वारु | ... | ... | ५६ |
| ध्येयचित्रें | ... | ... | ५७ |
| सुखांत वाटत आतां मुळीं न मोहकता | | ... | ५८ |

नजरेंत जुईचें फूल हंसें !
अन् बाहिर हास्यछटा विलसे !

कुण्या जन्मिचें भाग्य अनूपम
कुणास ठाऊक – सुदृष्य हें मम
वेड जिवाला लाविल सुमसम
बघतांच तया ही दृष्टि फसे

पिवळी चांफेकळी कोंवळी
दो बाजूला गुलाब कवळी
खाली लाजे गोड कुंदकळि
भरतात दिशांना प्रेमरसें !

ओष्ठ फुलांचे कीं अरुणाचे
निटिल अहा ! कीं शशिप्रभेचें
हनूवटीवरी प्रभात नाचे
कुरळे केंस समीर जसे !

अहा ! देवते ! तूं ज्योतिर्मय
रत्नमया तूं – तूंच प्रेममय
स्वर्गंगा तूं पावित्रतामय
हृदय गुंगलें भक्तिरसें !

कविता आत्मा तव, मम देवी !
चित् शक्तीनें जगा हालवी
हृदयांतुनि नव गाणें प्रसवी
रसरसे प्रेमही निर्झरसें !


ग्वाल्हेर, ६ मे १९२८.

नको लाडके — नको गडे ! मजकडे बघुं नको अशी
संशयी भाव मनीं आणिशी !

तुझ्या जिवाशीं संलग्नचि हा जीव जाहला अतां
तुजमुळें जगीं उरे रसिकता

तूंच जरी मग संशया अशा स्थान हृदीं देशिल —
अशा या दृष्टीनें बघशिल —

कुणा दुजाच्या मुखीं पाहणें सौख्याचा रवि — शशी
फुलावीं जीवनकमळें कशीं ?

जरि निरोप घेणें प्राप्त असें दुस्तर
मज अतां लाडके ! तुजजवळीं सत्वर
क्षणिं देच भेट या वियोगकालीं तर

पुन्हां भेटणें — आशा करणें व्यर्थचि का तें असें ?
कुणाला ठाऊक नशिबीं कसें ?

ग्वाल्हेर, १७ सप्टेंबर १९२७

एका गुणवती सुंदरीस –

तुजकडे
बघूं का गडे !
तुला आवडे
सांग मज सांग – मानतेस का ग याचा वेडे, राग ?

तूं परी
जगाच्या वरी
फुलांच्या घरीं
राहसी नित्य – स्वर्गांत चालते सत्ता तव हें सत्य !

लकलके
रात्रिसारखें
काय तें – मुके !
चंद्र का धवल ? – अंबरीं तेज कीं कळसाचें अनमोल ?

अंबरीं
महालावरी
कळस तव परी
सांग तो कोठें – कां गडे, पाहुनी मला मोडिसी बोटें ?

अंबरीं
महालावरी
सहस्रावरी
मणी चकचकती – त्या तुझ्या महालीं का मोत्याच्या भिंती ?

कावरी
कां ग बावरी
होसि सुंदरी !
भीति कां वाटे ? – मी प्रश्न विचारी भलते सलते तूतें !

बघुनीच
तुला मी नीच
जाहलों उच्च
वाटतें मजला – या तुझ्या मुखावरि खिळे दृष्टि चंचला !

हंसतेस
काय बघतेस
कुणा पुसतेस
नेत्रभाषेनें – मी वेडा का ग ? – सांग मला नेत्रानें !

मोहिनी
ठसतसे मनीं
पडे उन्मनीं
कल्पना विरती – विसरलों – कुठें मी ? खालीं किंवा वरतीं !

तडफडे
जीव हा रडे !
अगे तुजकडे
धांवतो आत्मा – कधिं बघेन झालें तव हृदयीं, परमात्मा !

तुजलाच
बघोनी साच
वाटतें नाच
नाचुं या काळीं – तुजलाच बघुनि ही प्रीती – ऊर्मी आली !

ये घरीं
भगिनि ! सत्वरीं
लाभुं दे तरी
तुझे सत्चरण – हृत्भाव फुलांसम गुंफुनि त्यां पूजीन !

जरि गडे
हें न आवडे
कष्ट तुज पडे.
तरी मज एक – दीनावर प्रेमें दृष्टीक्षेपच टाक !

त्या दृष्टिक्षेपें रमेल अंतरिं प्राण – सुंदरी !
हे कष्ट जिवाचे सारे मग विसरेन – सुंदरी !
आठवोनि तुजला प्रेमें गाइन गान – सुंदरी !

सांप्रती
घे नमस्कृती
हीच गुणवती
कुणा ठाऊक – कधिं भेटुनि प्रेमें करिशिल मम कौतुक !

२८ – २९ ग्वाल्हेर, ११ एप्रिल १९२८

## पुरतें नीटपणें मी न तुला पाहियलें

पुरतें नीटपणें मी न तुला पाहियलें
तसले शब्द मधू मी न कधीं ऐकियले !

कविता स्वैर पुरी – तीहि तशी कल्पकता;
सहजीं आळवितां चित्त तुझें रंगविलें !

पुसलें नाहिं कधीं नांव कुणा तें काय
कुठुनि वायुवरी तेंहि कुणी सांगितलें !

मिटले नेत्र – पुढें स्वप्न मधू डोकावें
सगळें ' तें ' तुज मी, तूंहि मला सांगितलें !

उरली एकच आशा म्हण, इच्छा म्हण कीं
बघणें मूर्त स्वरूपीं कधिं का ' तें ' अपुलें ?

उज्जयिनी, ९ फेब्रुवारी १९३१

पाहसी कां अंत माझा – ही अतां हातीं सुरी
दावुं का फाडोनि देवि ! भक्तिची मूर्ती उरीं !

जाउं दे वेड्या जगाला – काय तें माझ्यापुढें
प्रीतगंगा प्राशुनी मी मुक्त झालों सुंदरी !

वाटलें जेव्हां सुखाची कल्पना येतां मनीं
धुंद होवोनी तुझ्या-संगीं रमावें यावरी !

अंबरीची तारका डोळे वटारी कां अतां ?
पाहते सृष्टी रुसोनी तू अशी जातां दुरी !

हा भरे पेला सुखाचा – ओठ नाहीं लागले
ओढिसी हातांतुनी त्या वृत्ति कां ही आसुरी ?

हाय ! माझें संपतें आयुष्य सारें या क्षणीं
हो विलीन ज्योत अंतीं यामिनीच्या अंतरीं !

जाळिती ज्वाळा – विषादानें रडें हें मानस
कां हले आत्मा न तो ? – माया वरी या पांखरीं !

अश्रु हे सारुनी – चित्ता हांसवूनी बालिके !
ती कृपा होतां तुझी घेईन हातीं बांसरी !

३० – ३१ झांशी, ५ ऑक्टोबर १९२९

## दर्शन दे

उरली आस अतां एकच तें दर्शन दे !
भास असो स्वप्न असो त्यांत तरी दर्शन दे !

पहिलें चित्र जुनें लोपुनि तें गेलें का ?
मधुरा आठवणी आठविण्यां दर्शन दे !

अधरीं बोल अडे – येइ न तो बाहीर
तसली दृष्टि परी रोखुनिया दर्शन दे !

कांचन–रत्न गुणें शोभविलें दीप्तिंत तूं
तीविण ही दृष्टि अधू उज्वलनीं दर्शन दे !

कुठलें दिव्य अतां खिन्न मनीं हास्य पुन्हां !
प्रीत – हास्य – देवी ! या हांसविण्या दर्शन दे –

नीरस काव्य अतां सारें गमतें बाले !
काव्य – कला – जीवन तूं; काव्यिंच या दर्शन दे !

विरते पूर्वस्मृती – तीसह हा ! मीहि विरे
शेष नुरे – शेवटल्या याच क्षणीं दर्शन दे !

झांशी, ५ नोव्हेंबर १९२८

दुखवि न तव कुसुमहृदय सुंदरी शुभांगी
परिसुनि वच करुण मनीं करुणा हो जागी !

वदन मंजु मधु रसाल
शिंपिति रस सर्व काल
मलिन करिसि आजच कां व्यर्थ तयांलागी ?

लतिका वरि विविध फुलें
सुंदरता जेथ डुले
दर्शन-सुख भंग करी विकृति लव रंगीं !

सुखकर जरि शांत गगन
सुखकर तो पवन जवन
पर्जन्यें दाटतसें मात्र शीत अंगीं !

भारवि जी हास्ययुता
पृच्छात्मक उत्सुकता
ती नुरतां तन्मयता विरते तिजसंगीं !

स्वर कातर – दीन वदन
सुखवि कुणा वृत्ति करुण
आमंत्रण जी सहजी देइ अश्रुलागी ?



इंदूर, २६ जुलै १९३२

वसवूं ये संसार, साजणी !
वसवूं ये संसार,
भलतिकडे कां उगाच बघसी, काय तेथ मिळणार ?

मी तुज, तूं मजला, गडे ग,
मी तुज, तूं मजला,
सर्वेशानें एक एवढा ठेवा मज दिधला !

आणिक तें हरलें, सुखाचें,
आणिक तें हरलें,
वडिलोपार्जित द्रव्य, मातपितु, काय तयें अडलें !

गरीब दिसतों मी, खुळे ! का,
गरीब दिसतों मी ?
दौलत माझी जिवंत येथें — काय उरेल कमी ?

गृह माझें कोठें, पुसशि तूं,
गृह माझें कोठें ?
अगे ! तुझ्या सान्निध्यीं सारे महाल मम मोठे !

पसरें हें उद्यान, जगाचें,
पसरें हें उद्यान,
मती आपुली रमेल तेथें राहूं दोघे छान !

नको पसारा तो, फुकाचा,
नको पसारा तो,
कल्पकतेची दासी पुरविल सर्व कोड — नच तो !

निर्मियलें देवें, मिळविण्यां
निर्मियलें देवें,
प्रेमसंगमीं तन्मयतेचा लाभचि सद्भावें !

वृथाच ही धावे, मनुजता
वृथाच ही धावे,
अयुक्त मार्गीं व्यवहाराच्या — काय मोक्ष पावे ?

आपण नच वेडे, तियेसम
आपण नच वेडे,
दिसे जयांना पथ सत्याचा हा धावे इकडे !

कां विकल भावना भिववी तुझिया जिवा ?
चल, हांस पाहुनी प्रदेश हा नवनवा !
तूं येथील देवी, मी तुज पूजक हवा !

हृदयासी धरुनी, सुंदरी !
हृदयासी धरुनी,
दिव्य संसृती-सुख वांछिन मी तव जीवीं मिळुनी !



इंदूर, २५ जानेवारी १९३३

रजनिची अतां शीतता । न विरह-व्यथा
शांतवी माझी
करुं तरी काय मी आजी ?

कल्पना-तरंगावरी । उर्मिंच्या शिरीं
सुंदरी कांते !
तुज येईन भेटायातें !

आडवें न ये अंतर । कोण धरणार ?
गूढ नच वाट
ज्या देशीं मी सम्राट !

अंधार निमाला गडे । जधीं तव पडे
येथ सर्वत्र
भावना-प्रकाश विचित्र;

जणुं दिसें दूर मैदान । भाल तव छान;
तिलक-कुंकुम तो
बैसाया मंडप गमतो !

तीं सुप्त तुझीं लोचनें । पापणी बनें
क्षेत्र सौख्याचें
स्थळ माझ्या विश्रामाचें !

नासिकेंत मंद श्वास । दरवळे वास
सर्व कुसुमांचा
मी शोधी बागबगीचा !

अधरींच सुधानिर्झर । खळबळे–तीर
पाहुनी धालों
ती सुधा प्राशुनी आलों !

हनुवटी गौर तो गळा । गुंगवी मला
संगमरवर का ?
सौंदर्य-समाधी ही का ?

निद्रावश वक्षस्थळ । तुझें प्रेमळ
हालतें संथ
मज आश्रय देई अमित !

हृदयांत – प्रीतिसदनांत । शिरुनि मी आंत
पाहतों तुजला
तूं ओळखसी का मजला ?



इंदूर, ३० जुलै १९३२

डुलतात सुखानें नववेली
गोड सुमें — पखरण खाली !

अरुण-रक्तिमा दावी गगनीं
गाई वायू प्रभात-गाणीं
जिकडे तिकडे हंसरी अवनी
　　बाग लोभवी भंवताली !

आकाशींचीं तारा-सुमनें
वर्षवीति शेवटलीं किरणें
प्रभातदेवीवरी — मम नयनें
　　शुक्र-मुखीं दोन्ही खिळलीं !

कुंजांतरिं ती दिव्य शांतता !
घनपर्णांतुनि दृष्टी शिरतां —
बोलवी जणु सन्निध ती अतां
　　गुंगतां; वृत्ति मम तोषियली !

सौंदर्याची रास सभोंतीं
वश करिते हांसुनि मन किती !
परि तूं सुंदरि ! जवळि न संप्रति
　　ही एक विषमता जिव जाळी !

इंदूर, ११ सप्टेंबर १९३२

## जातसे तोल गिरक्या खातां

जातसे तोल गिरक्या खातां
सुंदरी ! न ये मज सांवरितां !

दिनभर नित काबाडकष्टुनी
घरासि येतां थकुनी भागुनी
घन अंधारीं एकहि, रमणी !
मज सौख्यकिरण न दिसे पुरता !

पुन्हां प्रभातीं कष्टदस्वप्नें
घरें पाडितीं जिवा कटुपणें
कुठें लकेरी तुझी शोधणें
त्या शांतवील जी गुणगुणतां ?

एकएकटें केविलवाणें
किती कंठावें जीवित सजणे !
कां दुःखानें नित मीं झुरणें ?
भोंवतीं सर्व जग हें हंसतां !

जिथें तिथें ही प्रणययुग्मकें
विहार करिती परस्पर-सुखें,
हिणवाया जणुं फिरविती मुखें
मीं तृषार्त नयनीं त्यां बघतां !

आणि भोंवतीं उनाड युवती
लटकी माया किती दाविती
मन जिंकाया जादू करिती !
कधिं जाल पडेल ? न ये कथितां

अरक्षिता ही जीवनवेली
आधाराविण अर्धी मेली,
हिरवीं पानें थोडीं उरलीं
जळतील तींहि बघ खचित अतां !

आजवरी जें जपुनि ठेविलें
तुझें पुष्प जरि तूं न सेविलें,
परित्यक्त जरि दुजें चोरिलें
मग दोष कुणाचा ? चल, घे त्या !

इंदूर, २४ जानवारी १९३३

भंगते जिवाची लोलुपता
जागृती या सदा होय अतां

सारंगीची साथ संपली
गीततान तव अधरीं जिरली
भिरभिर लहरी मंदुनि विरली
    क्षीण ही सकल हो तन्मयता

फुल्ल मालिका – गळली शीर्णा
धवल केतकी होई मलिना,
गंध – मंडलीं पसरे करुणा,
    विश्रमे दीपिका तेजयुता

थिजल्या तारा गरगरतांना
विझल्या ज्योती – सरल्या ताना,
शयनीं साऱ्या व्यग्र जिवांना
    शांतवी रजनिची प्रेमळता

कृष्ण ढगांच्या आड चंद्रिका
हो विलीन – ही निष्प्रभ राका
मजसम तुजही कष्टवीन का ?
    मी श्रान्त – जिवाला ये जडता

अधर थरथरे – विकल शब्दही !
खळबळ हृदयीं थांबत नाहीं
रक्तलोचनें जड झालीं हीं
    भाल तप्त – वृत्ती हो गलिता

निद्रा मंदिरिं बोलवि सत्वर
तिजसह जाऊं – चल – येथुनि दुर
जादू फिरविल तुजवर मजवर
मग उरेल कैशी अस्थिरता ?

इंदूर ११ सप्टेंबर १९३२

## व्यर्थ कां असें हंसणें

(कडेवरील आपल्या तान्हुल्याकडे पाहत हंसणाऱ्या पतीस- )

व्यर्थ कां असें हंसणें दुरूनि हें प्रिया !

बाळ गुणी पुष्पमणी
चंद्रकांत दीप्तमणी
हिरकणीच ही चिमणी
चमकते प्रिया !

ओठ गोड नेत्र गोड
दृष्टि कोंवळीहि गोड
हे कपोल गोड गोड
कितितरी प्रिया !

अधर मधुर स्पर्शतांच
सकल-कमल-विमलताच
दिसत कशी हालतांच
हळुच ते प्रिया ?

कोंवळ्या मुठी वळल्या
अंगुली निघे सुटल्या
कोंवळ्या कळ्या फुलल्या
गमत कीं प्रिया !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..............

केस शिरीं हे भुरभुर
उडति वायुनें वरवर
शोभा किति ही सुंदर
दिसतसे प्रिया !

तीट काजळी निटिलीं
ही बघा कशी खुलली
या गडे ! अतां जवळी
घ्याच या प्रिया !

ग्वाल्हेर, जुलै १९२८

## एक चित्र

अडे गालावरी बोट  खिळे ती दृष्टि भिंतीला
विचारीं वावरे वेडी  कुणाची सोनुली बाला !

कपाळीं घर्मबिंदूंची  अहा ! दाटी पुरी होई
तयांना आज प्रेमानें  पुसाया कोणिही नाहीं !

हृदीं सात्वीक भावांच्या  सुमंत्रें शुद्ध झालेली
खळाळे नेत्रिंची गंगा  कपोलीं खालती आली !

अहा ! निश्वास जीवाचे  सुवेगें येति बाहीर
मृदू जीवास कां ऐशा  असावा हा असा भार ?

थरारे जीव – डोळेही  किती निस्तेज हे झाले
कशाला कोंवळ्या देहीं  शहारे हे असे आले ?

अरे देवा ! कशासाठीं  अशांना दुःख तूं द्यावें
फुलें हीं – हींच रे अमुचीं  अरे ! यांनींच हांसावें !

४४ – ४५  कोलारस. २६ ऑक्टोबर. १९२७

# कां गडे बघसि तूं खुळ्यापरी ?

कां गडे बघसि तूं खुळ्यापरी
चुंबितां फुला मीं तुझ्या करीं ?

गोड गुलाबी लोल पाकळी
हंसतां हंसतां ही तांबुसली
चुंबितांच कीं लज्जित झाली
कां रोष तयाचा दृष्टि भरी !

शीर्ण जहाली काय चिमुकली ?
टवटवी कुठें दूर पळाली ?
तुझ्या करतलीं काय झोंपली ?
चिंताच कीं तुझें चित्त हरी !

सांग सांग कां माझे ताई ?
गोरेंमोरें मुख तव होई,
अश्रु कशास्तव करिती घाई
ओघळति बघ गडे फुलावरी !

चमत्कार हा काय जाहला ?
फुलांत तुझिया जीवहि आला
हास्यरसाचा पान्हा फुटला
कां म्लान राहसी तूंच परी !

डबडबलेले नेत्र जलानें
पुसुनि घेउं का या पुष्पानें
पुन्हा चुंबुनी कुतुहलतेनें
ठेवुं का लपवुनीं हृदंतरीं !

ग्वाहेर, ४ मे १९२८

## नको फुलावर रुसूं

नको फुलावर रुसूं
गडे ग नको फुलावर रुसूं !

हीं गरीब साधीं फुलें
कशि केविलवाणीं खुळे !
जाहलीं — तयां चल पुसूं ! गडे ग.

कां कांटा हा लागला
चिमुकल्या तुझ्या करतलां ?
मग कांट्यावरि या रुसूं ! गडे ग.

ही जुइची कोमल कळी
हंसविते पान पाकळी !
चल — जवळि तिच्या क्षण बसूं ! गडे ग.

ही कुठली वेडी तऱ्हा !
कां यांनीं केली त्वरा ?
मी डोळे का ग पुसूं ! गडे ग.

हे ओठ हालती कसे
हे नेत्र थबकले असे !
तीं तुला लागलीं हंसूं !— गडे ग.

हा राग जिवाचा असा
संपणार केव्हां कसा !
हा प्रश्न लागलीं पुसूं ! गडे ग.

वद – काय सांगु आपण
हांसतील सारींजणं !
मग तूंहि गोडसें हंसू हांसशिल –
नको फुलावर रुसूं !

ग्वाल्हेर, १७ एप्रिल १९२८

# पत्रलेखन

( वर्तमानकाळांत या पत्रलेखनाचा प्रसंग थोडा
जुना अथवा खेडवळ वाटल्यास नवल नाहीं. )

पत्र लिहिणें आज पडलें या जिवा ग साकडें,
हात बाई कांपतो अन् शब्द येती वाकडे !

तिकडली ही ओळ बघुनी ओळ ओढी मी जरी,
मोतियांची माळ कोठें अन् कुठें हे आकडे !

तिकडली ही शब्दरचना अक्षरें अन् त्यांतलीं,
पाकळ्यांच्या पृष्ठभागीं ओस* बिन्दू कीं पडे !

वास येई वाटतें त्या पाकळ्यांचा ग मला,
भास होई मोतियांची शुभ्रता नेत्रीं जडे !

पत्र वाचावें पुन्हां कीं ओळ ओढावी पुढें,
पत्र वाचूं, पत्र वाचूं – मोह ऐसा कां पडे ?

अन् कसें हें गोड लिहिणें " उत्तरें देशील का ? "
काय बाई रीत ऐशी – लाज नाहीं का गडे ?

ओळिच्या ओळी किती या ओढिल्या बाई इथें,
उत्तरीं मीही लिहूं का – नाहिं हें ' माझ्याकडे ' ?

लाज वाटे – सांग कैशी ओळ ओढूं मी सखे ?
हात बाई कांपतो अन् शब्द येती वाकडे !

राग येऊं दे तयां मी पत्र नाहीं धाडित,
पत्र परि येईल बाई – मीच त्यांना आवडे !

* ओस–दंव



कोलारस, १९ ऑक्टोबर १९२७

## न तें बाल्य-सौंदर्य दृष्टिपुढें ये--

न तें बाल्य-सौंदर्य दृष्टिपुढें ये
न रुम्झुम् कुठें वाजती कंकण
विलोला न ती रक्तकांती पदांची
दिसे आणि तें दिव्य गोरेपण !

कुठें लोपती आज नेत्रद्वयांच्या
मनोहारिणी तारका तेजवान्
न चापल्य तें शैशवीचें विहारी
नुरे चित्र अन् ती कला भाग्यवान् !

अहो ! देवुनी दान देवेश्वरानें
असें ओढिलें कीं पुन्हां मागुती !
कधीं दीन या मानवी भावनांची
न का त्यास वाटे मुळीही क्षिती ?

न पिंडांतुनी जीव बाहीर येई,
असी तीव्र ही कापिते अंतर
तुटे तट्तडा तार ही जीवनाची
जळे वाढता भव्य आशांकुर !

उज्जयिनी तें इंदूर प्रवासांत, ऑक्टोबर १९३४

नभिं पुन्हां वीज ती कडकडली
तारका तिच्यासह तडतडली !

हंसली मोदें भीषण रजनी
बसुनि एकली जनविरहित वनीं
विकट हास्य तें अघोर वदनीं
बघुनि चंद्रिकाही रडली !

त्या हास्याच्या लहरी भीषण
वायुरूप मग पावुनि तत्क्षण
दिशादिशांतरिं माजविती रण
घाबरोनि अभ्रें गडगडलीं !

कुठें पळाल्या इतर तारका ?
सर्व निमाल्या ! कुणी तारि का
संकटसमयीं अशा अनेकां !
शृंखला तमाची जगिं पडली !

तम—कारागृहि भुतें नाचितीं
वृक्षलतांना तीं संचरितीं
भीषण तांडव नृत्यहि करितीं
थांबतां नृत्य उपडीं पडलीं !

हंसतां हंसतां काळे काळे
रजनिनेत्रहि ते अश्रुजळें
भरुनि येत, मग धार आदळे
खालती — जळें तीं नच अडलीं !

ग्वाल्हेर, ४ नोव्हेंबर १९२७

## *यतीन्द्राची स्मृति

फुंकिली त्यानें तुतारी या उठा झोपेंतुनी
या यतीन्द्राच्या स्मृतीला ठेवुंया ताजी कुणी !

हाय ! माझी मायभू माझ्याकडेही पाहते
दुर्निराशा रक्तिमा आणीत तीच्या लोचनीं !

मीहि सौख्यें पोसलों अन् वाढलों अंकीं तिच्या
पाहतां ही दुर्दशाही आर्द्र होना पापणी !

धिक् अरेरे हें जिणें – हें व्यर्थ आयू वाढणें
ही पुरे आतां गुलामी – धिक् अशी ही राहणी !

येवुं दे देवाधिदेवा ! कांहि ऐशी भावना
अंतरीं या आमुच्याही – लागु दे कीं टोचणी !

मी वसू या आर्यभूचा ही अशी दास्यीं रडे
देहही अर्पीन आतां मुक्ततेच्या कारणीं !

तो बघा पूर्वक्षितीजीं ये यतीन्द्राचा रवी
वंदुनी त्या – या स्मृतीला ठेवुंया ताजी कुणी !

(*सुप्रसिद्ध बंगाली क्रांतिकारक कै. जतीन दास.)

झांशी. ५ ऑक्टोबर १९२९

## दैव धाडी भूवरी

( आयुष्यांत दैवाच्या निष्ठुरतेचा प्रत्यय पदोपदीं आल्यास मानवी हृदयास असें वाटलें तर नवल नाहीं. दैवाच्या उत्पातांबद्दल देवालाच दोष द्यायचा नाहीं तर मग कोणाला ? )

देव वेडा खेळ खेळे, दैव धाडी भूवरी
सृष्टिला वेडी कराया, दैव धाडी भूवरी !

शांत झालेल्या मनांची शांतता ना पाहवे
द्यावया उद्विग्नता कीं, दैव धाडी भूवरी !

पुष्पसंगें रंगल्या जीवास देण्या यातना,
त्याच पुष्पाला खुडाया, दैव धाडी भूवरी !
सौरभाची संस्मृती ती राहिली जीवीं जरी,
हृत्स्मशानीं ती जळाया, दैव धाडी भूवरी !

शोभली कोठें दिगंतीं मुग्ध तारा सुंदरी,
नाश व्हाया ती सकाळीं, दैव धाडी भूवरी !
हांसलीं जीं जीवचित्रें आज – अश्रूही उद्यां;
क्रूरता काळास देण्यां, दैव धाडी भूवरी !

प्रेमखाणी, कोमलांगी, ‘ ती ’च आकर्षी मला
दाविण्यां आशा–निराशा, दैव धाडी भूवरी !

दुष्ट देवा ! खेळ कैसा हा ? तुझा शोभे तुला
मागणें आहे कुणाचें, ‘ दैव धाडी भूवरी ! ’
मानवी चित्तीं वसे जी पूज्यता भक्ती तुझी
नाश व्हाया दैवदोषें, दैव धाडी भूवरी !

शांत हो वेड्या मना ! उद्विग्नता आतां पुरे !
दैवलीला हीच कीं तो दैव धाडी भूवरी !



ग्वाल्हेर, २६ जुलै १९२७

## पथ अर्धाहि न मीं आक्रमिला !

(ध्येयप्रवण पण परिस्थितीमुळें निराश झालेल्या मन:स्थितीचें हें एक शब्दचित्र आहे.)

पथ अर्धाहि न मीं आक्रमिला
ओढितें कुणी मागें मजला !

दूर कुणी ते स्वर आळविले
अवचित माझ्या कानीं आले
मंजुळ त्यांचें गाणें झालें
परि गातां येईना मजला !

हातीं धरिला फळा कुंचला
मिश्ररंगिं रेषाहि ओढिल्या
हरित्सृष्टिच्या छटा निराळ्या
रेखणें तयांची कशी कळा ?

समोर खेळत रानांतिल तीं
पिलें खगांचीं किती चिंवचिंवती
फुले चित्त– परी उडोनि जाती
धावतां तयांना धरण्याला !

रजनी दावी तारा–शोभा
करी सकाळीं उषा प्रलोभा
सायंतनिंची क्लांत सुप्रभा
मज भेद तयांचा नच कळला !

जीव हळहळे – तळमळ होई
विशाल वांछा अतृप्त राही
विषण्णतेनें वरि मी पाही
तम दिसे तिथें नच चंद्रकला !

५४ – ५५

उज्जयिनी, ४ सप्टेंबर १९३०

## भडकलेला वारू

मोकाट भटकतो हा वारू
सांवरूं तयाला ? कसें करूं ?

दिधला सोडुनि पथ नित्याचा
पळे चहुंकडे करितो नाचा
भय नच देती खळगे खांचा
आंवरूं तया मी कसें करूं ?

उल्लंघोनी भव्य पाळही
उडी घेइ उद्यानीं जाई
बागा, शेतें, हिरवी राई
तुडवितों पदीं – कैसें वारूं ?

जरब दाविती किती परोपरि
गेला धावुनि तो त्यांच्यावरि
दे टापांचा माराचि भारी
मी दुःख तयांचें कसें हरूं ?

सकल विश्व तो व्यापित फिरला
ज्ञेयाज्ञेयीं धैर्यें शिरला
पापपुण्यपथ तेथ न उरला
घालवूं ? परतवूं ? काय करूं ?

नको मजकडे त्याचें रक्षण
प्रविण न मी – मज कळे न लक्षण
दोष न द्या मज व्यर्थचि बुधजन !
त्या नित्य बंधनीं किती धरूं !

इंदूर, २२ जानेवारी १९३३

हाय ! वाटे ध्येय–चित्रें व्यर्थ हीं रेखाटलीं !
पेटलें काळीज तापें, आसवेंही आटलीं !

भग्न झालेला निशेचा कुंभ हातीं घेउनी
तुच्छ तृष्णा तोषवाया मृत्तिका मी चाटली !

हात घाली वन्य पुष्पा ओढुनी घ्याया तृणीं
हाय ! दर्भांनींच तेथें अंगुली ही काटली !

अंधकारीं दूरुनी जी सौम्य वाटे दीपिका
भस्मकारी आग ती पाहूनि छाती फाटली !

पूजिली जी उच्चभावें मूर्ति – राहे फत्तर !
ठेचिलें तीनें उरा – अंतीं निराशा दाटली !

लाघवी स्वप्नेंच किंवा फोल आशा मादक !
सोडवीतां गूढ यांचें बुद्धि सारी आटली !



इंदूर, ११ सप्टेंबर १९३२

## सुखांत वाटत आतां मुळीं न मोहकता

सुखांत वाटत आतां मुळीं न मोहकता,
जिवास विद्ध करी ही अगाध अस्थिरता !

नको अतां सुमनें गोड ती लकेर नको
नको विलास, पुरे सर्व मुग्ध मादकता !

पुरें जिवीं भिनतें कालकूट बाहिरचें
करी कठोर मनां – आंतली जळे मृदुता !

नव्यानव्या लहरी हेलकाविती जगता
गती अजस्र ! अशा स्पंदनीं नुरे जडता !

समोर भीषण संग्राम हा बलीं–अबलीं
समोर कष्टदशा, द्वेष, दुःख अन् कटुता

समोर 'आ' करुनी ठाकतात दुर्भिक्षें–
समोर घात जगाचाच हा दिसे बघतां !

कराल काल पुढे – होम कीं प्रदीप्त जणूं
सुखाहुती पहिली त्यांत देवूं रे नियंत्या !

इंदूर, ६ डिसेंबर १९३४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३४८५२ वि:
क्रमांक ........ नों. दि. 2.5.83

# संकीर्ण

| | | | |
|---|---|---|---|
| ओढ | ... | पृष्ठ | ६१ |
| चांदणें | ... | ... | ६४ |
| स्त्री-गीत | ... | ... | ६५ |
| स्वप्न | ... | ... | ६८ |
| पोर माझी चिमुकली ती शहाणी | | ... | ७१ |
| निरोप | ... | ... | ७३ |
| त्वत् पूजनार्थ रचिलीं नित मंजु गानें | | ... | ७४ |
| एका प्रिय भगिनीस | ... | ... | ७६ |
| प्रबोधन | ... | ... | ७७ |
| तो | ... | ... | ७९ |
| अस्तंगत देवता | ... | ... | ८० |
| लीला | ... | ... | ८१ |
| ही हांसते मी पहा | ... | ... | ८२ |
| उभ्या त्रिभुविं वंद्य तूं भरतदेश उद्धारका | | ... | ८४ |
| फुलेल लतिका कधींतरी म्हणूनी पाणी दिलें | | ... | ८६ |
| लेखेल काय जग तुच्छ जनास ऐशा | | ... | ८८ |
| अपूर्णतेचे बळी | ... | ... | ९० |
| ईश्वरा | ... | ... | ९२ |

पूर्व बंगाला–उत्तरेकडील
गांव होता प्राचीन तो विशाल
सरिद्गंगेची क्रीडनस्थलें तीं
तयांपैकीं ती भूमि एक होती !

संथ वाहे चिरकाल नदी ओघ
संथ खळखळ हो नित्य सानुराग
गर्द हिरव्या झाड्याच डोलवून
मान तीरावर – पटवितात खूण !

आणि प्राचीच्या लोल लोल अंकीं
बालरविही खेळतां प्रभा फाकी
बघत लीला ती जान्हवी विलोल
विषमतेनें होतसे लाल लाल !

पुन्हां संध्येशी भांडभांडुनीही
जाय भास्कर संतापुनी स्वगेहीं
कितीदां तो नेत्रास अश्रुपूर–
सौख्य–दुःखीं वाहिनी अशी चूर !

सर्व लीला ही पाहते समोर
जीर्ण पर्णांची कुटी उभी दूर
चंदनाच्या झाडींत छिन्नभिन्न
जगापासुनि जणुं पूर्णपणें भिन्न !

वंग वारे वाहती स्वैर गार
वंग–भाषा–वास्तव्य चहूंवार
वंग बाबूंची पूर्वजांकिता ती
' सस्य शामल ' भूमीच तिथें होती !

महाराष्ट्राचे यश:कीर्ति वारे
वैभवाच्या समयींच अहा ! सारे
वाहिले ते तेथही स्वाभिमानें
साक्ष त्याची देतील अजुनि रानें !

तिथें वेलीच्या आड कुटीमागें
गोष्टि जीवाच्या मनीं कुणीं सांगें !
गोष्टि शौर्याच्यां यशाच्या गभीर
महाराष्ट्राचा जीव – कुणी वीर !

अहा वार्धक्यें जीवकळा गेली
तीव्र दृष्टी निस्तेज अतां झाली
पवनकंपानें हात हलूं लागे
हृदय होतें परि पूर्णपणें जागें !

तोंच आला नेत्रांत अश्रुपूर
निघे खळखळ खालती – भरे ऊर
मुक्या हृदयाचे पूर्ण मुके बोल
कसे ऐकावे – नसे तयां मोल !

श्वास आला बाहेर निराकार
परी त्यांतच साठले जीवसार
कंप होई शरिरास – उभा राही
निश्चयानें गंगेकडेच पाही !

' महाराष्ट्रा ! मम जीव मायदेशा !
तुला अंतरलों हाय ! पुण्यदेशा !
तुझ्या कार्यी वाहिला जीव सारा
अतां पावूं मी कसा तुज उदारा !

मुखीं होती पुटपूट अशी कांहीं
पुढें चाले – क्षणि स्तब्ध उभा राही–
तोंच भागिरथी पुण्य–तिरीं आला
मनीं झाला संतोष – गमे – त्याला.

उभा राही – सप्रेम हात जोडी
पुण्यगंगेवर अंजलीहि सोडी
शरिरयष्टी ती ताठ अहा ! झाली
" महाराष्ट्रा ने " वदे – उडी घाली !



कोलारस, १४ जून १९२८

हें बाहेरीं फुलुनि हंसतें चांदणें पौर्णिमेचें
धावें वेडें शिशुसम करी खेळ नाना तऱ्हेचे,
पर्णापर्णांतरिं शिरतसे शोधण्यां अंधकारा
भीरु कोठें लपुनि दडला तो मिळेना तयाला;

वृक्षांनीं त्या वरि उचलिलें आपुल्या अंगभागीं
दूरस्था ती कुटि बघतसे खेळ राहून जागी,
आकाशाचे नयन खिळले, पाहती बाललीला
मायामुग्धा भुवनजननी कौतुकें चुंबि त्याला;

कांटेरीं तीं कठिण झुडपें – शेत काळें पुढील
वक्रा साऱ्या दगडमयही पायवाटा मधील,
भग्न स्थित्यंतराचि उरलें – ते जुने दीर्घ वाडे
अंधःकारीं भिवविति किती मोडकीं तीं कवाडें !

खालीं तेथें गढुळ भरलें पावसाचें तळेंही–
सारें झालें अभिनव – गमे – येथलें तें न कांहीं;
आली ज्योत्स्नाकृत नवनवी धूसरा दिव्य शोभा
कांती ओढे हृदय, करिते मानसीं ती प्रलोभा;

वायुस्पर्शें सहज पडदा हालतांना गवाक्षीं
स्निग्धा दृष्टी गृहिं फिरवुनी तें इथें काय लक्षी ?
बाही आतां मजसि – करितें खूण बाहीर तेथ,
जाई मी हीं सकल बघण्यां रम्य शोभा सुखांत !

इंदूर, १९ मार्च १९३२

बसूनी बसूनी मला कंटाळा आला
कांहीं करमेना बाई मूळी जीवाला

पुस्तक टाकूनी खाली – बाहेर आले
लख्ख ऊन दूपारचें होतें लोपलें

पलीकडे पुष्पवेली बाग हिरवी
तीकडेच वेडें मन दृष्टी फीरवी

मनाची ओढच बाई चालत गेले
चमेलीच्या वेलीपाशीं गात बसले !

गाणें माझें पाखरां–फूलांचें ऐकूनी
चमेलीही झाली पूरी तल्लीन गानीं !

प्रेमें आलिंगूनी माझी ताई हीरवी
केसांवरी पाठीवरी हात फीरवी !

कूरवाळी मला माझी गीती संपली
कूशींतच तीच्या मला गुंगीही आली !

× × ×

गगनीं मेघांची माला दीसूं लागली
जलबिंदू पुष्पें कीती खाली झरली

एकलीच तेथें बाई किती नाचले
रानींवनीं वेड्यापरी किती फीरले !

प्रदेश सुरेख मोठा तो रमणीय
एकलीच – मला तेथें कोणाचें भय ?

वृक्ष होते मोठे तैशीं सान कांटेरीं
झुडूपेंही — तेथेंच मी घातली फेरी !

नाचतां नाचतां दुष्ट कंटक मला
अयाई ग ! खालंतून पायीं लागला !

कळ आली — मटकन खालीं बसले
रानींवनीं एकलीच कीती रडलें !

झुडूपांत काट्यामधीं एकलें फूल
जीव्हाळयाचें प्रेम दावी गोजीरें मूल.

× × ×

" कशाला कशाला पोरी ! — अशी फीरसी !
कशाला कशाला आतां दु:ख करीसी ! "

आणखीही बोले, परी रुद्ध जाहला
कंठ, दु:ख भरे जीव व्याकूळ झाला !

पून्हा शुष्क हास्य करी, फूल वदलें,
" धरिसी ग वेड बाई तूं कां असलें ?

कष्टवीसी काया गडे ! व्यर्थ गोजीरी
परत — परत फीर आपुल्या घरीं !

कशाला फुलांचा ध्यास — वेलीची माया
नको — पाखरांचें प्रेम — गानही गाया !

खुळे ! सर्व स्वर्गीय हें — दिव्याचें द्वार,
कसें बंधनीं जगाच्या हें दीसणार ?

सोडा – सोडा सर्व पाश – बंधनें तोडा
नंतर आमूचा ध्यास – प्रेमही जोडा ! "

× × ×

थंडगार वायू आला कुणीकडून
आले सत्य–सृष्टीमधीं मी स्वप्नांतून

कल्पनेला पटलें न सारें बोलणें
रानफूल बोले स्वप्नीं कैसें मानणें ?

परी बाई ! वेलीकडे वर पाहिलें
एकही न हांसरें तें फूल दीसलें

चोहीकडे पडलेल्या फूलांच्या राशी
म्लान सर्व – त्यांसही ये खिन्नता कशी !

मन खाई किती ! नेत्रीं अश्रूही आले
विचार दे कष्ट 'फूला अवमानिलें !'

चमेलीच्या वेली ! ताई ! खरें हें का ग ?
भलताच प्रश्न परी उत्तर सांग !

उत्सूक जाहले किती – वर पाहिले
डोलवी ती वेली मान – मन तोषलें !

× × ×

वरी एक चीमूकली लाडकी कळी–
आले घरीं चुंबूनी मी तीची पाकळी !

 कोलारस, २९ जून १९२८

मज स्वप्न पडे – स्वप्न पडे ग आई !
तूं ऐक अतां लवलाही.
तें वाटतसें इवलेसें ग होतें
घर अपुलें मज आठवतें.
फुलबागहि ग सुंदरशी फुललेली
किति मोठी ती भंवताली
तिथलाच मला आंब्यावरचा राघू
बोलवूं लागला – सांगूं ?
तो शब्द करी, शब्द करी मंजूळ
मी गेलों त्याच्या जवळ.
मजपाशीं तो आला आई उडुनी
बोलला मला हांसोनी
'झोपलास का रे बाळा !
रे ऊठ – खेळुं वेल्हाळा !
आजि रंग नवा ये खेळा
मग ऊठ गड्या ऊठ ऊठ रे बाळा !
चल खेळ खेळुं वेल्हाळा' !

मी हंसलों ग आई हंसलों तेव्हां
तो बोल बोलला जेव्हां
तो दिसला ग सुंदर कितितरी अंगें
धावलों तयाच्या संगें
मज चौकांत दिसला गोपबाळ
हांसला पाहुनी खेळ !

मग वेडीही टकमक पाहे आई !
ही हंसरी माझी ताई !
तों दारांत बसला हिरवा राघू
कशी गंमत झाली सांगूं ?
तों कोणीसं आलं मागुनि आई !
मी मागें वळुनी पाही
आपुलेच बाबा होते
तेथेंच उभे आई ते
मी सांगत नाहीं भलतें
तो धरिला ग बाबांनीं मग राघू
लागलों तया मी मागूं !

परि एकहि तो शब्द नाहि ते वदले
क्षण मुळीं न ते ग हंसले !
मी मागितला राघू तरिहि न वदले
डोळ्याला पाणी आलें !
तूं आई ग होतिस माजघरांत
कामांत गुंतली आंत
मी बोलविलें तुजला तेव्हां आई
म्हटलें ग बाबा पाही !
या ताईला तुज मज बाळालाही
पाहिलेंच त्यांनीं आई !
तों झालं ग काय – न कळलें मजला
राघूसह आकाशाला

ते उडूं लागले — आला
राग का आमुचा त्यांना ?
तूं आई रडसि कशाला ?
कां रडसी ग रडसी कां ग आई !
मज सांग अतां लवलाही !

ग्वाल्हेर, ११ फेब्रुवारी १९२८

# ोर माझी चिमुकली ती शहाणी

पोर माझी चिमुकली ती शहाणी
कुठें लपली ग गोड हंसराणी ?
कुण्या पुष्पाच्या भाळली स्वरूपा
पळाली ती कुणिकडे गडे ! चंपा !

काय आला मोगऱ्यावरुनि वारा
क्षणीं झाली वश काय तया चोरा
मोगऱ्याच्या का आड बघूं कांहीं
कसें पाहूं – कोणिही तिथें नाहीं !

निशीगंधा का लाजुनी समोर
अशी होई जवळूनि दूरदूर ?
गोड माझी मैत्रीण तूं जुई ग
कुठें गेली ती सांग मला सांग !

कोण हांसे तें बाजुला दुरून
गुलाबाची कलिकाच ती लहान
सांग वेडे ! कुणिकडे तुझी ताई
तुझ्यासंगें खेळूनि गुप्त होई ?

उंच आकाशीं तारका लपून
वसे – गेली का शोधण्यास – छान !
समुद्राच्या पोटांत रत्न–फूल
बोलवी का तिज तेंच गोड मूल !

ते उडूं लागले – आला
राग का आमुचा त्यांना ?
तूं आई रडसि कशाला ?
कां रडसी ग रडसी कां ग आई !
मज सांग अतां लवलाही !

ग्वाल्हेर, ११ फेब्रुवारी १९२८

पोर माझी चिमुकली ती शहाणी
कुठें लपली ग गोड हंसराणी ?
कुण्या पुष्पाच्या भाळली स्वरूपा
पळाली ती कुणिकडे गडे ! चंपा !

काय आला मोगऱ्यावरुनि वारा
क्षणीं झाली वश काय तया चोरा
मोगऱ्याच्या का आड बघूं कांहीं
कसें पाहूं – कोणिही तिथें नाहीं !

निशीगंधा का लाजुनी समोर
अशी होई जवळूनि दूरदूर ?
गोड माझी मैत्रीण तूं जुई ग
कुठें गेली ती सांग मला सांग !

कोण हांसे तें बाजुला दुरून
गुलाबाची कलिकाच ती लहान
सांग वेडे ! कुणिकडे तुझी ताई
तुझ्यासंगें खेळूनि गुप्त होई ?

उंच आकाशीं तारका लपून
वसे – गेली का शोधण्यास – छान !
समुद्राच्या पोटांत रत्न—फूल
बोलवी का तिज तेंच गोड मूल !

उंच आकाशीं कसें मी उडावें
जळीं कैसें तुजसवें मी बुडावें !
पुरे कविते ! हें वेड — भेट देई
तुझ्या जीवा ग ताळ कसा नाहीं ?

कोलारस, १३ जून १९२८

फुलें विहरतीं जगीं किति अनंत चोहींकडे
तयांसमचि नादतीं सुहृदयें जनांचीं गडे !
कशास मग रूक्ष हें हृदय मोहिलें लाडकें !
कसें तुजसि आवडे भुवन हें असें मोडकें ?

नको – विहर जा अतां कुणिकडे तरी दूरशी
पुरे – परत जा, कशास मजला अशी मोहिशी ?
तुझ्या शुभगुणांमुळें फुकट मी गुणी जाहलों
तुझे गुण तुला बरे – किति जगांत कष्टावलों !

अतां निघत अश्रु हे बघ मदीय नेत्रांतले
तयांतच तुला दिसो सकल दु:खही आंतलें
विहार – मधु गायनीं तुजसवें पुरा रंगलों
अहा ! सकल सारुनी तुजकडेच मी धावलों !

तुझी मजवरी कृपा यशसुकीर्ति तोषप्रद
असे तरिहि दे गडे ! मज निरोप तो दु:खद
तुला विसरणें असे किति अशक्य, हें जाणतों;
तरी विसरणेंच मी – सुकविते ! क्षमा मागतों !



कोलारस, २० जून १९२८

# त्वत्पूजनार्थ रचिलीं नित मंजु गानें

त्वत्पूजनार्थ रचिलीं नित मंजु गानें
जीं गाइलीं हंसत मी पुढतीं सुखानें;
उत्सूक आगमनपूर्व मन क्षणांत
हो पाहतां सुममनोहर मूर्त शांत;

भोंतीं किती विखुरलीं कमलें विलोल
दृष्टी तुझी विहरतां चहुंवार लोल
संध्या-समीर विचरे – नत अंशुमाली
सायंतनीं पसरली अरुणस्थ लाली;

ती रक्तिमा—द्युति मनोहर पूर्व—गालीं
वाढूनि दिव्य, जगतां मधु मोह घाली,
पश्चीम दिग्वधु भयाकुल नाथ जातां
सोडूनि, हो लव सुशांत प्रभापुनीता;

दिव्यांगना अमरलोकिं वसूनि – खाली
ये भूवरी जणुं, मला अनुभूति झाली;
दूरस्थ मित्र मिळतां बहुता दिसांनी
ये प्रेमपूर – मज होइ तसेंच राणी !

डोले समोर कलिका निशिगंध शुभ्रा
हांसे बघोनि नभिच्या पळत्याच अभ्रा
चाहूल शब्द निघतां तुझिया दिशेनें
तीही मुखास फिरवी सहजीं त्वरेनें;

या खालच्या हरितवर्ण तृणांकुरांनीं
त्वत्स्पर्श आस धरुनी वसतीच रानीं
केली गडे ! मज गमे, वच सत्य जाण
होतात तीं तुजमुळें पुलकायमान;

पुष्पें, फळें, बहुविधा नव वृक्ष–वेली,
आकाशवात, जड भूमि, तटस्थ ठेली
दावी न कंप जलपृष्ठ – उभे ल्व्हाळे;
सारें सुनिश्चल – वच श्रवुनी न बाले !

निःशब्दता पसरली तुज का कळेना
गे निश्चले ! मम अपेक्षित तें मिळेना
निस्तेज होत जग – त्या करि तेजयुक्त
निर्वाक्यता त्यजि करी सकलांस मुक्त;

पाषाण नृत्य करितील तुझ्या सुहास्यें
वेली वचें प्रगटवील अनंत लास्यें,
धावेल तो रवि पुन्हां परतूनि येथ
येतील पद्म उडुनी पादिं पूजनार्थ !

७४ – ७५ इंदूर, फेब्रुवारी १९३२

## एका प्रिय भगिनीस–

तुझ्या जवळिं वाटतें निशिदिनीं असावें नित
तुझाच सहवास तो मज गमेल तोषप्रद
परी भगिनिदेवते ! मम सुभाग्य नाहीं तसें
मिळेल मज सौख्य तें तव समागमाचें कसें !

तरी नच निराश मी – तुजकडेच एक क्षण
बघोनि करितों सदा हृदय-भाव संरक्षण
मिळे न सहवास संप्रति जरी न जन्मांत या
मिळो कधितरी सुखें – मम मिळो न आशा लया !

सुखें विहरशी सदा प्रियजनांत तूं आपुल्या
सुखें उधळशी सदा नवकळ्याहि दृष्टींतल्या
जगावरि – कधीतरी सुमधुरे ! तयांची नवी
प्रभा प्रियजनांसवें मजहि ती पुन्हां दाखवी !

नको मज जगांतल्या सकल सौख्यराशी अतां
फुलेंहि फुललीं नको मज नको तशा त्या लता
जगीं मजसि एकलें सुखदधाम तूं केवल
तुझ्या सुखसमागमींच मम स्वर्गही निर्मल

कुठेंहि असलीस तूं तरि रहा सुखानें सये !
अखंड हंसवो तुझ्या मुखशशीस ईश स्वयें
सुहास्य-किरणें अहा ! मग पडोत माझ्यावरी
मलाहि हंसवोत तीं – भगिनिप्रेम तें दे तरी !

ग्वाल्हेर, ५ ऑगस्ट १९२७

सुहास्यवदना अहा ! उगवली रवीची प्रभा
गडे ! उघड नेत्र, ती बघ सुशोभवीते नभा
अजूनि कळलें न का सुखद रात्र ती लोपली
प्रभातसमयींच कां तुजसि सुप्ति ये आपुली !

अहा ! हंसत लोपली कुणिकडे उडूंचीं फुलें
सुगंध भरला नभीं अजुनि वायुसंगें हले
तुझ्या मुखफुलासही मधुर ये गडे ! गंध तो
तुझ्या श्वसनिं लाडके ! मजकडे पुढें वाहतो

अतांच हंसरी उषा तव मुखावरी खेळली
फुलावरिहि नाचली हळुंच गोडसें हांसली
कळे न मज कां परी इथुनि नाहिंशी जाहली
छटा परि तिची गडे ! तव कपोलिं ही राहिली

अनंत फुलतीं फुलें चहुंकडे सुवेलींवरी
अखंड डुलतात हें बघुनि मीहि हांसे, परी
अनंत सुमरम्यता तव हृदींच ही साठली
तुझ्यांतच गडे ! गमे सकल हीं फुलें दाटलीं

विशाल बघ हा वरी तळपतो कसा भास्कर
विलोल वदनांवरी उडत येत त्याचे कर
विनम्र नयनीं तुझ्या तळपतो सुखाचा रवी
गडे ! किरण दावुनी मजसि जादुनें भारवी

विशुद्ध नयनां अतां उघडि या गुणी बालिके !
सुहास्य मग रंगुं दे बघत याकडे सारिखें
उषा पुनरपी अहा ! मधु हंसेल – तारा सुम;
सुदिव्य उगवेल सत् दिनहि हांसरा तो मम !

ग्वाल्हेर, ३ मे १९२८

नच कुणिहि तयाला पुशिलें !

निराधार – त्या आश्रय नुरला
आप्त सोयरे सरले !

यष्टी टेकित दारीं येतां
सर्व ' दूर जा ' वदले !

रक्त-लोचनीं पाणी दिसतां
कुणि न मनीं हळहळलें !

" ऐका देवा ! दया येउं द्या ! "
शब्द वायुवरि विरले !

मध्यान्हीची टळली वेळा
एक शीतहि न दिसलें !

भीषण वर्षवि रविकर वन्ही
अंग पोळलें सगळें !

' पाणी-पाणी ' – कोरड कंठीं
थेंबहि दोन न दिधले !

दृश्य पाहिलें पांथस्थांनीं
काय कुणाचें अडलें ?

हो इहयात्रा पूर्ण जिवाची
हसलें जग – नच रडलें !



इंदूर, १३ सप्टेंबर १९३१

# अस्तंगत देवता

हा हा ! गेली हृदय अमुचें दूर लाथाडुनी ती
इच्छा–आशा सकल विरल्या लोपत्या यौवनांत,
आतां भासे जगत सगळें शून्य दीप्तीविहीन
अंध:कारीं नयन मिटुनी वाहवूं अश्रुधारा !

झालें सारें जड शरिरही – थांबतीं हस्त गात्रें
थांबे तैसे रुधिर सरणीं – जीव गेला उडूनी !
आम्ही झालों मृत विसरलों जीवनाची कहाणी
पक्षांसंगें हृदय उडतें वृक्षवृक्षांतरीं हें !

नाना स्थानीं किति बघितल्या देवता मंदिरांत
नाहीं – नाहीं तिळहि दिसलें पाहतां रूप तीचें;
नाना वाद्यें – स्वर सनइचे – रागिण्या रंगलेल्या,
नाहीं – नाहीं परि परिसला एकही सूर तीचा !

सप्तर्षींच्या विरल गगनीं चंद्रिकेच्या विमानीं
ज्योत्स्नाकारांतरिंहि – निजल्या पुष्पबालेसमीप
पर्णाखाली – तरल हलत्या वातधारेवरील
गंधासंगें नच – नच तिचा शोध लागे कुठेंही !

आयुष्याची मृदुल कलिका वाहुनी पूजियेली
सर्वस्वाची करुनि हवनें नित्य आराधियेली,
होतां सारें तप फलदही – देवता मोक्षदात्री
होई अस्तंगत परि अम्हां बांधुनी दु:खसूत्रीं !

इंदूर, २९ मार्च १९३२

# लीला

( एक चित्र )

सकाळ झाली – झांप उडोनी लीलेचीं लोचनें
रत्नमाणकांपरी विकसती शुभ्र दीप्तिच्या गुणें !
हस्तद्वय नाजूक सारती विसकटल्या कुंतलां
गोड गळ्याची पुंगी नागापरी भारवी मला !

दुपारची ती रुक्ष वेळ – परि लीलेचें हांसणें
कर्णपथीं ये वाहत मंजुळ – तें दुडदुड धावणें !
प्रौढ मंडळी शयनीं मग्न – गृहांतरीं स्तब्धता
कोण संचरे ही भंवताली जणूं स्वर्ग–देवता !

सायंतारा नभीं उगवतां दीपासन्निध अहा !
मृदुल करा जोडूनि उभी ही लीला माझी पहा;
परमेशाचें रूपचि अवघें दिसतें त्या मूर्तित
प्रभा वदनिंची तळपतांच मी स्थिरे दृश्य पाहत !

रात्रीं तारा किती पहुडती विशाल त्या अंबरीं
माझी तारा सुखें पहुडली सान बिछान्यावरी;
किती उराशीं ओढूं तिजला – द्यावी किति चुंबनें !
तिच्या संगतीं झालें माझें अमृतमय कीं जिणें !

इंदूर, २९ जुलै १९३२

## ही हांसते मी पहा

(आधुनिक सुशिक्षित बेकार तरुणांच्या
जीवनक्रमांत असले प्रसंग नवीन नाहींत.)

मी जों दृष्टि तुझ्याकडे वळवितों तूं दूर कां पाहसी ?
कांहीं प्रश्न विचारितां गमतिचा तूं स्तब्ध कां राहसी ?
झाला अस्थिर जीव – तोंड कथितें – निश्वास कां टाकिसी ?
कांते ! जीवकळी अशी दुखवुनी कां मज्जिवा पोळिसी ?

झाले लोचन लाल – चोरुनि कधीं बिंदूहि ये वाहत,
त्याला सारुनि दूर कां लपविसी – हो चेहराही नत;
रागानें मग का असें करिसि तूं – छे ! ती खुळी कल्पना
नाहीं आजवरी कधींहि शिवला तो दुष्ट तूझ्या मना !

माझें दैन्य बघूनि काय व्यथिते ! तूं दुःखिसी अंतरीं
जाचे शल्य तुझ्याहि हेंच हृदयीं का हीनतेचें तरी !
छे ! तेंही न शके; तुझेंच असतें ना नित्य प्रोत्साहन
“हें सारेंच अशाश्वत प्रियकरा ! कां कष्टवावें मन !”

जेव्हां मी असतों बसूनि सदनीं कामाविणें एकला
तूं देसी मज धीर दोन वचनीं सांगूनि कांहीं मला;
माझें मस्तक चेपिसी मृदु करें – तूं शांतवीसी कळा
अन् हास्यें भवतींच स्वर्ग अपुला तूं निर्मिसी निर्मळा !

संयोगीं तुझिया किती मिळविलें प्रेमांतलें वैभव
सारें त्या पुढतींच तुच्छ गमतें ऐश्वर्य – मानी भव.
माझे कष्ट मला मुळीं न दिसती जेव्हां बघे मी तुला
तूं देसी दयिते ! अमोल कुठली संजीवनी प्रेमला !

होई हें विपरीत आज ! न कळे दैवाचिया मानसीं
आहे नूतन काय ? दैन्य छळतें आम्हास — तूं कष्टसी !
दुष्टावा करुनी तुला अहह ! कां माझ्यासवें बांधिलें
देवानें, चिर या तुझ्या सुनयनीं अश्रू मुके ठेविले !

केले मींच अनंत दोष — गमतें — जन्मांतरीं त्या गत
माझी ठेव मला मिळे परत ही — मी व्यर्थ ना कष्टत;
तूं — तूं दोषविहीन — आचरणही तूझें किती निर्मल,
माझा संग तुला म्हणूनिच विधी दावी तुलाही बल !

सौख्यानें असतीस — सत्य — जगतीं कोण्या दुज्याच्या घरीं
राजाच्या सदनीं समृद्ध वसनीं राज्ञीपदीं सुंदरी !
हा हा ! या दगडास दैव कुठुनी वेलीसवें भूषवी
होता उष्ण उन्हांत तो प्रथम तैं वेलीस या पोळवी !

माझे शब्द न तें — कटू शरचि मी मारी जिव्हारीं कसा ?
गेली शुद्ध कुठें — कळें न मज कां मी दुष्ट झालों असा !
गेलों सन्निध आणि घट्ट धरिलें दोन्हीं करांना अहा !
आले शब्द "नका — नका वदूं असें — ही हांसते मी पहा !"



इंदूर, २२ मार्च १९३२

# उभ्या त्रिभुविं वन्द्य तूं भरतदेश–उद्धारका !

उभ्या त्रिभुविं वन्द्य तूं भरतदेश–उद्धारका !
स्वराज्यरणसंगरीं विजयि वीर तूं नायका !
करीत यश–दुंदुभी तव निनाद वाऱ्यावर
मुखें सुयशगान मी करुं कसें तुझें पामर ?

मनीं वसत कल्पना नव चमत्कृतीपूर्ण कीं
तुझ्याविषयिं – कुंठते अबल दीन ही मन्मती;
महा हिमगिरीपरी अचल भव्य त्वत्कार्य कीं
बघूनि गमतोसि तूं खचित ईश या भारतीं !

सदाच हंसरें तुझें वदन पाहुनी मंगल
पळे दुरि उदासता – प्रगट होइ तेजोबल,
हृदस्थ दुबळेपणासम अशुद्ध त्या भावना
क्षणीं उडविल्या तुझ्या स्मितप्रभंजनें पावना !

कितीक नजरेंतली प्रखर तीव्रता भासते
प्रवेशुनि हृदंतरीं सहज दुर्बला कांपिते,
उभारवि अनेक त्या जड प्रचंड मूर्तीसम
सुवर्ण–प्रतिमा जणूं तव विशाल चित्तीं मम !

अचेतन जडासही त्वरित देइ जी चेतना
स्फुरे कणकणांतुनि स्फुरवुनी तयाच्या मना,
जिची प्रबलता करी सहज वीर भ्याडासही
किती तळपते तुझ्या वदनिं उज्वला शक्ति ही !

कुठेंहि निघतां तुझें सुखद नाम लोकीं कधीं
अमीर कुणि, दीन वा, अबल, मूर्ख किंवा सुधी
तुझ्या चरितवाहिनींतिल अनंत दिव्य स्मृती
मुदें विमल मौक्तिकासमाचि दावि अन्याप्रती !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम [illegible] दि: [illegible]
क्रमांक ........ नों. दि. 2-[illegible]-63

८४-८५

इंदूर, जानेवारी १९३३

## फुलेल लतिका कधींतरिं म्हणूनि पाणी दिलें !

फुलेल लतिका कधींतरि म्हणूनि पाणी दिलें
जिवापलिकडे तिला जपियलें — खतां ओपिलें;
अहा ! उगवते न जों कळि लहान सायंतनीं
करी तिजसि नष्टही वृषभ कोठुनी येउनी !

बसूनि सदनीं किती परिसली सुगीतावली
सुहृद्गणिं मधुस्वरें प्रियपदें मुदें गाइली;
सतार करि साथ — ये जवळि मोहनीय क्षण
अदृष्ट कटु ! थांबतें तुटुनि तार तें वादन !

गळ्यांत कर घालुनी बसुनि सन्निधीं मंगल
स्मृती—सुखदमंजुषा उघडिते प्रिया प्रेमल;
गतक्षण सुखान्वित प्रगट जों न होती पुढें-
कठोर भवितव्यताप्रद विचार आणी रडें !

विशाल रचिलें मनीं किति महाल आशामय
'दिसेल सगळें खरें' मग असाहि ये प्रत्यय;
प्रचंड घुमटावरी कळस बैसवी सोज्वल
तडित् विफलता पडे — त्वरित सर्व हो निष्फल !

दिवा मिणमिणे जळे करित दाटसें काजळ
प्रकाश नच — लेखनीं सहज नेत्रिं लागे कळ;
प्रदीप नव आणितां मग दुजा अहा ! दैव तें !
विरे सकल कल्पना — अबल लेखणी थांबते !

खुशाल जगिं चालुं दे विफलते ! तुझें नर्तन
असे मजसि न क्षिती – तव कसेंहि हो वर्तन;
न ये प्रणय–वैभवीं तुजमुळें सुखश्रेष्ठता
विराम मिळतां परी मज मिळेल संतुष्टता !

८६ – ८७

इंदूर, ७ मार्च १९३२

' लेखेल काय जग तुच्छ जनास ऐशा '

नाहीं जयें मिळविलें धन संपदेला
कीर्ती – स्तुती नच कधीं भुलवी जयाला
जो दीन – दर्शवि परां नच स्वप्रकाशा
लेखेल काय जग तुच्छ जनास ऐशा ?

येतीं न ज्या मधुर कृत्रिम भाषणें तीं
हांसे न जो वरिवरी दडवूनि खंती;
पावूनि आत्मशुचितेस निगर्व वेडा
जो शांत – वाचि न कुठें निज नित्य पाढा !

स्वप्नें मनीं उमटतीं – सुविचार येती–
लेखूनि चित्तफलकीं जपतो सदा तीं
होई कधीं जड अधीर अशा मनाला
त्यांतील देत रिझवी नव रत्नमाला !

उद्वेग, खंत, असुखें, जळत्या निराशा
देऊनि कष्ट करितीलहि सज्ज नाशा;
वाटे न ज्या कधिंहि ती लवलेश चिंता
– विश्वास आंत – सरतील विवेक येतां !

सारें विशुद्ध अविकल्प मऊ विशाल
साधें दयारसपरिप्लुत सर्वकाल
ज्याचें खुलें हृदय भूषण एक मात्र
जें भावना–वितरणीं – मननीं सुपात्र !

क्षेपांत एक बघते जग दृष्ट ज्याची
दृष्यें अमंगळ, भयप्रद, सत्, सदाचीं;
कारुण्य आणि सहजीं नयनांत नीर
सौंदर्य--दर्शन तया परि देइ धीर !

होईल काय जरि कोणि पुसे न त्याला ?
तो ध्येयमग्न -- नित पाहिल विश्वलीला;
मार्गावरी सरकुनी पुढती सुखानें
पाहील तो कधिंतरी तरि मूर्त स्वप्नें !



उज्जयिनी, १४ मार्च १९३१

कुठें जराशी कलिका फुलावी
प्रभातकालीं विपिनीं दिसावी,
तोडील कोणी तिजला हंसून
देईल फेकूनि क्षणांत अन्य !

मनीं विचारी कधिंही न हर्ता
उत्फुल्ल कैसा नव गेंद होता !
हो ! वासनेचा लव खेळ होई
कळी परी हाय ! मरूनि जाई !

× × ×

अपक्क बिंबाधर यौवनेचे
आकर्षिती चित्त बुधाबुधांचें
दैवें कुठें ये अनुरूप योग
करून घेतील अनेक भोग !

पीता, अनाकर्षिय, तेजहीना
जाती पुढें सारुनि दूर दीना !
विलासिनी जी रुचिरा भविष्यीं,
बाल्यींच आयु:पट भव्य नाशी !

× × ×

आरक्त गालीं विलसे प्रभेची
ज्योतीच – नेत्रें अति तीव्र ज्याची !
जों शैशवांतूनि पुढें सरे तों
आपत्ति नाना बघतो महा तो;

वडीलधारे, जग भोंवतालीं
घेतील शोषूनि तया अकालीं !
होतां न उत्साह, न आस पूर्ण
युवा स्थिरे अल्पवयीं अजाण !

× × +

सृष्टीसती, वायु नभीं विलोला
लाली उषेची, सुविहंगमाला,
सतेज पुष्पें, रमणीय दृश्यें,
विचित्र रम्याकृति हीं मनुष्यें;

संवेदना मुग्ध, अमोल प्रीती,
कोणी न पूर्णाप्रति पोंचितातीं;
अपूर्णतेचे बलि हे बघून
हा जीव जाई किति व्याकळून !

इंदूर, २४ जानेवारी १९३३

ईश्वरा !

जेथें फिरे न सुखशीतल मंद वायू
जेथें न वृक्ष, लतिका, सुम, पल्लवी ही
चंडांशु तप्त किरणीं अवनीस दाही
ऐशाच रुक्ष विपिनीं करि नष्ट आयू !

तेथें विझेल निमिषांत मदीय ज्योती
होतील शांत मनिंच्या सगळ्याच ऊर्मी
कांहीं न रम्य दिसतां पुढती विरामीं
जें मोहवील – फिरवील मनास अंतीं !

REFBK-0013497
REFBK-0013497
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

उज्जयिनी, ११ मार्च १९३१

पूर्वस्मृति